
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १७ ◆ अंक ३५३
www.ramprahar.com
गुरुवार १० जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
स्मार्ट फिश स्टॉक असेसमेंट सिस्टीमबाबत करार/२
उसर्ली ते विचुंबे रस्त्याचे काम मार्गी/३
लॉर्ड्सवर बुमराह-सिराजचे असणार इंग्लंडला आव्हान/८

## पंतप्रधान मोदींना नामिबियाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नामिबियाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'ऑर्डर ऑफ द मोस्ट एन्शिएंट वेल्वित्शिया मिराबिलिस'ने गौरवण्यात आले आहे. हा पुरस्कार साल १९९५ पासून सुरु झाला आहे. विशिष्ट सेवा आणि नेतृत्व गुणांचा आदर करण्यासाठी नामिबिया राष्ट्रामार्फत हा पुरस्कार दिला जात आहे. या पुरस्काराचे नाव वेल्वित्शिया मिराबिलिस नावाच्या एका अत्यंत दुर्लभ आणि प्राचीन वाळवंटी झुडुपावरून ठेवण्यात आले आहे. हा दुर्मीळ झाड केवळ नामिबियातच आढळते. हे झाड संघर्ष, दीर्घायु आणि स्थायित्वाचे प्रतीक मानले जाते आणि हिच भावना या पुरस्काराच्या माध्यमातून झळकली जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नामिबियाचे राष्ट्राध्यक्ष डॉ. नेटुम्बो नांदी-नदैतवा यांच्या दरम्यान द्वीपक्षीय वार्तालाप झाला.

# तेलगळतीची तपासणी होणार
## जेएनपीए जलपरिसराबाबत अधिवेशनात प्रश्न

**मुंबई : प्रतिनिधी**

जेएनपीए परिसरातील तेलगळती रोखण्यासाठी आणि समुद्रातील तरंगता कचरा गोळा करण्यासाठी जेएनपीएने एमटीयूएलच्या माध्यमातून यंत्रणा कार्यान्वित केली आहे. या बाबींवर समाधानकारक कारवाई व्हावी, यासाठी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना जेएनपीएच्या यंत्रणांची पाहणी करण्यासाठी पाठवण्यात येईल, असेही मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.



विधान परिषद सदस्य प्रसाद लाड यांनी जेएनपीएने बंदरात होणारी तेलगळती, कोळसा वाहतूक होऊन प्रदूषण आणि त्यामुळे मासेमारीचे नुकसान होत असल्याच्या प्रश्न विचारला, त्यावर मंत्री मुंडे यांनी उत्तर दिले.

मंत्री मुंडे म्हणाल्या की, जेएनपीएच्या आजूबाजूच्या समुद्र परिसरात मत्स्यमारीस बंदी आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून त्या भागात मत्स्यमारीस परवानगी नाही.

## 'आमदाराकडून कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण अयोग्य'

**मुंबई :** आमदार निवासात स्वच्छतेच्या संदर्भात काही तक्रारी असल्यास त्याबाबत अधिकृतरित्या तक्रार मांडून त्यासंदर्भात कारवाईची मागणी करता येऊ शकते. भाजीपाला, पदार्थ खराब असणे, दुर्गंधी येणे, या गोष्टी निश्चितच दुर्लक्षित करता येणार नाहीत. तथापि, तेथील कर्मचाऱ्यांना मारहाणीचा मार्ग योग्य नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत सांगितले.

एका आमदारांनी कॅन्टीन कर्मचाऱ्याला केलेल्या मारहाणीचा व्हिडिओ समाजमाध्यमांत व्हायरल झाल्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, अशा प्रकारचे वर्तन कोणत्याही लोकप्रतिनिधीला भूषणावह नाही. यामुळे संपूर्ण विधिमंडळाची आणि आमदार पदाची प्रतिमा मलीन होते, असेही त्यांनी नमूद केले.

# राज्याच्या नागरी भागात तुकडेबंदी कायदा रद्द
## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची विधानसभेत घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणारा कायदा १९४७ नुसार ठराविक प्रमाणात कमी क्षेत्रफळ असलेल्या जमिनींची खरेदी-विक्री कायद्याने प्रतिबंधित होती. या पार्श्वभूमीवर १ जानेवारी २०२५ पर्यंत शहरी भाग, गावठाण पासून २०० मीटर पर्यंत आणि विविध प्राधिकरणांमधील भागात झालेले सर्व तुकड्यांचे व्यवहार मान्य करण्यात येणार आहेत. अशाप्रकारे एक गुंठेपर्यंत जमिन व्यवहारासाठी



तुकडेबंदी कायदा रद्द केला जाईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेची विधानसभेत केली.

याबाबतची अधिकची माहिती देताना मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी १५ दिवसात आदर्श कार्यप्रणाली तयार करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे सुमारे ५० लाख कुटुंबांना जमीन व्यवहाराचा फायदा होणार आहे. १ जानेवारी २०२५ नंतर अशा व्यवहारांमध्ये प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. याबाबत सदस्य अमोल खताळ यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेचा चर्चेदरम्यान सदस्य जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, प्रकाश सोळंके, विक्रम पाचपुते, अभिजित पाटील यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. **(पान २ वर..)**

## निवडक

### एकाच कुटुंबातील तिघांची विष पिऊन आत्महत्या

**बेळगाव :** एकाच कुटुंबातील चौघांनी विष प्राशन करून जीव देण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. यातील तिघांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे परिसरावर शोककळा पसरली आहे. बचावलेल्या चौथ्या व्यक्तीची प्रकृती गंभीर आहे. कर्नाटकमधील बेळगावात ही घटना घडली.

### चंद्रपुरात पावसाचा कहर; गोसेखुर्द प्रकल्पातून विसर्ग

**चंद्रपुर :** जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ६७.८ मिलिमीटर पाऊस झाल्याची नोंद करण्यात आली आहे. गोसेखुर्द प्रकल्पातून १८००० क्यूमेक्स पर्यंत पाण्याचा विसर्ग करण्यात येत असल्याची माहिती समोर येत असून पूर परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे.

# गुजरातच्या वडोदरामध्ये पूल कोसळून १० जणांचा मृत्यू

**वडोदरा : वृत्तसंस्था**

गुजरातच्या वडोदरा जिल्ह्यातून एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. बुधवारी सकाळी ७:३० वाजता महिसागर नदीवरील ४३ वर्षे जुना गंभीरा पूल कोसळला, यात १० जणांचा मृत्यू झाला असून ६ जण जखमी झाले आहेत. हा पूल मध्य गुजरात आणि सौराष्ट्राला जोडणारा एक महत्त्वाचा दुवा होता.



या घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांना २ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. तसेच, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनीही मृतांच्या वारसांना ४ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपये देण्याची घोषणा केली आहे.

वडोदरा ग्रामीणचे पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, पुलाचा १०-१५ मीटर लांबीचा एक स्लॅब कोसळल्यामुळे दोन ट्रक, एक ईको व्हॅन, एक पिकअप व्हॅन आणि एक ऑटोरिक्षा नदीत कोसळली. वडोदरा कलेक्टर अनिल धमेलिया यांनी सांगितले की, बचाव पथकांनी आतापर्यंत ९ मृतदेह बाहेर काढले आहेत आणि ६ जणांना सुखरूप वाचवण्यात यश आले आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## नागपूरमध्ये पावसाचे थैमान; यंत्रणा सज्ज

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर शहर आणि जिल्ह्यातील पावसाच्या स्थितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.१०) नागपूर जिल्हाधिकारी, नागपूर महापालिका आयुक्त आणि पोलीस आयुक्तांकडून आढावा घेतला. गेले दोन दिवस नागपुरात संततधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे सखल वस्त्यांमध्ये पाणी साचले आहे.

सध्या येथील परिस्थिती नियंत्रणात आहे. तथापि कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी एनडीआरएफ आणि एसडीआरएफ चमू सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. मुसळधार पावसाचा इशारा लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने आज जिल्ह्यातील शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. नागरिकांनी सुद्धा सुरक्षेची काळजी घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

## पेणमधील विद्युत अभियंता लाच घेताना जेरबंद

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या पेण मंडळ कार्यालयात कार्यरत उपअभियंता संजय जाधव यास २५ हजार रुपयांची लाच मागून, त्यापैकी पाच हजार रुपयांची प्रत्यक्ष लाच घेताना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या विशेष पथकाने कार्यालया शेजारीच सापळा रचून रंगेहाथ अटक केली आहे.

वीजेचा खांब असलेल्या जागेवरुन अन्यत्र हलवण्याच्यण् कामाकरिता उपअभियंता संजय जाधव याने तक्रारदारांकडे २५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीनंतर ही रक्कम १५ हजार रुपयांवर आली. यानंतर तक्रारदाराने नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून रितसर तक्रार दाखल केली. लाचलुचपत विभागाने यातक्रारीची खातरजमा करुन अत्यंत योजनाबद्ध पद्धतीने पेण विज वितरण कार्यालयाच्या शेजारी मंगळवारी सापळा रचून लाचखोर उपअभियंता संजय जाधव याला पाच हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात अटक केली.

या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पेण पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

## वायुसेनेचे विमान कोसळून दोन वैमानिक ठार

**जयपूर : वृत्तसंस्था**

राजस्थानमधील चुरु जिल्ह्यात भारतीय हवाई दलाचे जग्वार लढाऊ विमान अचानक काही तांत्रिक बिघाडामुळे कोसळले. अचानक झालेल्या या घटनेने त्या परिसरात एकच खळबळ उडाली. ही घटना घडल्यानंतर तात्काळ बचावकार्य आणि अग्निशामक दलाचे पथक आणि पोलीस घटनास्थळी पोहोचले. या विमानात दोन वैमानिक होते. त्या दोन्ही वैमानिकांचा मृत्यू झाला

राजस्थानमधील चुरु जिल्ह्यातील रतनगड शहराजवळ भानुदा गावामध्ये आज दुपारच्या सुमारास भारतीय हवाईदलाचे जग्वार लढाऊ विमान अचानक कोसळले. तेथील स्थानिकांना जोरदार आवाज ऐकू आल्यावर आणि धुराचे लोट दिसल्यानंतर त्यांनी तात्काळ पोलिसांना याची माहिती दिली. जग्वार लढाऊ विमान हे वायूसेना विभाग जमिनीवरून हल्ला करण्यासाठी किंवा शोध मोहिमांसाठी याचा वापर करते. अपघात झाल्याची अधिकृत माहिती चुरुचे पोलीस अधीक्षक जय यादव यांनी दिली असून घटनास्थळी दोन मृतदेह सापडले आहेत.

विमान ज्याठिकाणी कोसळले तिथे मोठा आवाज झाला आणि भयंकर स्फोट सह धुराचे लोट दिसू लागले. त्यामुळे भानुदा गाव परिसरात भीतीचे वातावरण आहे. स्थानिकांनी मोठ्या संख्येने अपघातस्थळाकडे धाव घेतली. असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासन शर्थीचे प्रयत्न आहेत.

# विद्यार्थ्यांनी जास्त मेहनत घेऊन अभ्यास करावा -अरुणशेठ भगत
## ■ तोंडरे येथे मोफत वह्यावाटप

**पनवेल :** विद्यार्थ्यांनी कमी वयात जास्त मेहनत घेऊन अभ्यास केला पाहिजे, असे आवाहन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी तोंडरे येथे वह्या वाटपाच्या कार्यक्रमावेळी केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हे गेल्या ३० वर्षांपासून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबवून गरजूंना मदतीचा हात देण्याचे काम करत आहे. **(पान २ वर..)**






राष्ट्रीय स्वयंसेवक संघ... स्वातंत्र्यपूर्व काळात २७ सप्टेंबर १९२५ रोजी केशव बळीराम हेडगेवार यांनी स्थापन केलेली संघटना. रा. स्व. संघाला या वर्षी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. या कालखंडात तावून-सुलाखून निघालेल्या या संघटनेने अनेक चढउतार पाहिले आहेत. संघाच्या या दीर्घ वाटचालीची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. म्हणूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त लेखमाला सुरू करीत आहोत. गुरूपौर्णिमेला म्हणजे गुरूवार, १० जुलै २०२५ रोजी या लेखमालेतील पहिला लेख प्रसिद्ध होईल. त्यानंतर दर रविवारी पुढील लेख प्रकाशित केले जातील.

-मुख्य संपादक



# मत्स्यव्यवसायात एआयचा वापर; स्मार्ट फिश स्टॉक असेसमेंट सिस्टीमबाबत करार

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नव्या युगात प्रवेश करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाच्या मदतीने जलाशयांचे व्यवस्थापन, मत्स्यसंवर्धन आणि माहिती संकलनासाठी 'स्मार्ट फिश स्टॉक असेसमेंट सिस्टीम' तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण करार करण्यात आला.



या करारावर स्वाक्षरीचा कार्यक्रम ८ जुलै २०२५ रोजी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या उपस्थितीत पार पडला. मार्वल या शासकीय कंपनीसोबत झालेल्या या करारामुळे महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसायात आधुनिकतेचा नवा अध्याय सुरू होणार आहे. यावेळी पदुम विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे तसेच मार्वल कंपनीचे संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या करारानुसार, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून जलाशयांची माहिती व त्यांचे सर्वेक्षण, मत्स्य उत्पादनाची अचूक आकडेवारी तयार करणे, मच्छींच्या साठ्याचे परीक्षण (Stock -ssessment), विविध प्रकारच्या माहितीचे डिजिटल संकलन, मच्छीमारांना माहिती व सल्ला देणाऱ्या प्रणालींचा विकास या सर्व गोष्टी अत्याधुनिक पद्धतीने करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्रातील पहिलाच उपक्रम तकृत्रिम बुद्धीमत्ता आधारित 'स्मार्ट फिश स्टॉक असेसमेंट सिस्टीम' हा उपक्रम महाराष्ट्र राज्यात प्रथमच राबविण्यात येणार आहे.

यामुळे जलाशयांचे व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल तसेच शाश्वत मत्स्यव्यवसायाच्या दृष्टीने धोरणे आखणे सुलभ होईल.

या उपक्रमामुळे मच्छीमारांना योग्य मार्गदर्शन मिळणार असून, उत्पादन वाढीबरोबरच जलसंपत्तीचे संवर्धनही साधता येणार आहे. मत्स्यव्यवसायामध्ये विज्ञानाधारित निर्णय प्रक्रिया राबवण्याची ही महत्त्वपूर्ण पायरी ठरणार आहे.

यावेळी बोलताना मंत्री नितेश राणे म्हणाले, मत्स्यव्यवसायाच्या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून महाराष्ट्र देशात आघाडीवर राहील, यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा आहे. यामुळे पारंपरिक मत्स्यव्यवसायाला नवे बळ मिळेल आणि शेतकरी व मच्छीमारांना आधुनिक व्यवस्थापनाची जोड मिळेल.

# अपघात टाळण्यासाठी जुम्मापट्टी धबधबा येथे सूचना फलक

**कर्जत : प्रतिनिधी**

वर्षासहली साठी आलेल्या पर्यटकांनी सावधानता बाळगाविण्यासाठी कर्जत फोटोग्राफर असोसिएशन आणि नेरळ पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने पर्यटकांना आवाहन करणारे फलक नेरळ माथेरान घाटरस्ता येथील जुम्मापट्टी धबधबा येथे लावण्यात आले आहे.



कर्जत तालुक्यामध्ये पावसाळ्यात पर्यटकांची गर्दी पाहायला मिलत असते. सह्याद्रीच्या पर्वतरांगेतून वाहणारे धबधबे तसेच माथेरान सारख्या पर्यटन स्थळाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मुंबईवरून कर्जत कडे येत असतात पण हा आनंद घेत असताना पाण्याचा किंवा धब-धब्याच्या खोलीचा अंदाज नसल्याने पर्यटकांचे जीव जात आहेत त्यामध्ये सेल्फी आणि रिल्स बनवण्याच्या नादात आपला जीव धोक्यात टाकत आहेत

या सर्व बाबींचा विचार लक्षात घेता नेरळ फोटोग्राफर असोसिएशन आणि नेरळ पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने सामाजिक बांधिलकी च्या हेतूने नेरळ परिसरातील धबधब्यांवर सूचना फलक लावून समुद्र असो, डोंगरदऱ्या असो वा धबधबे असोत, पावसाळी पर्यटन जेवढं मोहक तेवढंच घातक. सेल्फी किंवा रिल्समुळे आपला अमुल्य जीव धोक्यात घालू नका. नुसते धाडस टाळा. पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह अचानक वाढतो. खडक – रस्ते शेवाळ्याने निसरडे होतात. त्यामुळे जीव धोक्यात घालू नका. असे जाहीर आवाहन करणारे फलक धबधब्यांवर लावण्यात येत आहेत.

याप्रसंगी नेरळ फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष चेतन केळकर, सचिव दिलीप मसणे, खजिनदार मनोज भोईर, यांच्यासह असोसिएशनचे इतर सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच येणाऱ्या पर्यटकांनी पर्यावरणाची सौंदर्यता राखावी व आपल्या सोबत आणलेल्या प्लास्टिक किंवा पाण्याच्या बॉटल पर्यटनास्थळी टाकू नये.असे आव्हान देखील नेरळ फोटोग्राफर असोसिएशन यांच्या वतीने दिलीप मसने यांनी केले.

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीची प्रक्रिया सुलभ करणार

**मुंबई, : रामप्रहर वृत्त**

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्ष पाच लक्ष रुपये रकमेचे आरोग्य संरक्षण पुरविण्यात येत आहे. ही योजना कॅशलेस आहे. यापेक्षा अधिक खर्च झाल्यास प्रशासकीय विभागामार्फत वैद्यकीय प्रतिपूर्ती करण्यात येते. ही प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात येईल, असे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य सत्यजित तांबे यांनी या संदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सहभाग घेतला.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. शेलार म्हणाले, शासकीय कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास कुटुंबियांना सुलभतेने परतावा मिळावा यासाठी ही प्रक्रिया ऑनलाइन, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यात येईल. महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये आणखी काही आजारांचा समावेश करण्यात येईल तसेच राज्यात सर्व रुग्णालयांमध्ये ही योजना लागू होण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागासोबत समिती तयार करून याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

# पनवेल महानगरपालिकेचे बहुउद्देशीय प्रकल्प दोन बहुमजली वाहनतळ निर्मिती वाहतूक कोंडीवर उपाय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अतिशय वेगाने विकसित होत असलेले पनवेल शहर हे बाजारपेठेसाठी सुप्रसिद्ध असे आहे. आसपासच्या परिसरातील नागरिक पनवेलमध्ये खरेदीसाठी येतात. पार्किंगची समस्या असल्यामुळे वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण होते. ही वाहतुकीची कोंडी दूर करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने दोन बहुमजली वाहनतळ (पार्किंग) निर्माण करण्याचा महत्त्वाकांक्षी बहुउद्देशीय प्रकल्प हाती घेतला आहे.



२३ हजार ७३७ चौरस मीटर क्षेत्रफळ असणारे दहा व बारा मजली पार्किंग संकुल बांधण्यात येत आहे. काम सुरू झाल्यापासून दोन वर्षात हे प्रकल्प पूर्ण होतील. अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी दिली आहे. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या पुढील बाजूस व प्रभाग कार्यालय ड इमारतीच्या बाजूस येथे हे दोन बहुमजली पार्किंग स्थळ उभारण्यात येत आहेत यासाठी प्रस्ताव सल्लागार म्हणून मे. डिझाईनो आर्किटेक्स अँड प्लॅनर्स या संस्थेची नेमणूक केली आहे. बहुउद्देशीय व्यवस्था साधारणतः १२१ कोटींचे हे प्रकल्प आहेत. या दोन्ही वाहन संकुलामध्ये ५१० दुचाकी तर ३४५ चार चाकी वाहनांची पार्किंग सुविधा उपलब्ध असेल. त्याचप्रमाणे या ठिकाणी वाहनांच्या चार्जिंगची व्यवस्था सुद्धा करण्यात येईल. शिवाय वाहन धुण्यासाठी वॉशिंग सेंटर ही असणार आहेत. संकुलातील व्यापाऱ्यांसाठी वाहन पार्किंग राखीव असेल. शिवाय आसपासच्या परिसरातील नागरिकांना आपले वाहने या ठिकाणी ठेवायची असल्यास त्यांना देखील मासिक व वार्षिक भाडेतत्त्वावर वाहन पार्किंग साठी जागा उपलब्ध असेल.

नागरिकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांसोबतच महानगरपालिकेचे आर्थिक बळकटीकरण देखील यातून होऊ शकते. व्यवसायासाठी १४५ दुकाने, ८ ऑफिस साठी च्या जागा, शिवाय बहुउद्देशीय सभागृहातून होणारे उत्पन्न या बाबी आर्थिक उन्नतीसाठी उपयुक्त ठरतील.

## दहा व बारा मजली संकुल

***सुमारे ७० कोटी ८५ लाख ५६ हजार ५६१ रुपये खर्चाचे हे १० मजली संकुल असणार आहे. तळघर एक मध्ये २०७ दुचाकी, तळघर दोन मध्ये २९ चार चाकी, तळमजला १२ व्यावसायिक दुकाने, पहिला मजला १८ व्यावसायिक दुकाने, दुसरा ते सहावा मजला प्रति मधला २८ चार चाकी प्रमाणे १४० चार चाकी वाहने, तसेच सातवा मजला २६ चार चाकी वाहन पार्किंग क्षमता असणार आहे. आठव्या व नवव्या मजल्यावर सभागृह असून त्याची आसनक्षमता २८२ आहे. याखेरीस दहाव्या मजल्यावर बहुउद्देशीय सभागृह ज्याची आसनक्षमता ५०० अशी आहे. तर बारा मजली संकुलात तळघर क्रमांक एक मध्ये १२१ दुचाकी वाहन, तळघर क्रमांक दोन मध्ये १४२ दुचाकी वाहन, तळमजला व पहिला मजल्यावर अनुक्रमे ५९ व ५६ व्यावसायिक दुकाने, ८:ऑफिस साठी जागा, तिसरा ते बारावा मजला यामध्ये प्रति मजला ४ दुचाकी व १५: चार चाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था, याखेरीज मोठे भव्य टेरेस असणार आहे.***

अशा प्रकारची ही भव्य दिव्य संकुले पनवेल महानगरपालिकेसाठी महत्त्वपूर्ण असणार आहेत निश्चितच यामुळे वाहतूक कोंडीची मोठी समस्या मोठ्या प्रमाणात दूर होईल, असा विश्वास चितळे यांनी व्यक्त केला. आज दिनांक नऊ जुलै रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत या प्रस्तावांना आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

# बेकायदेशीर पार्किंग शुल्क वसुली; ठेकेदारावर गुन्हा दाखल करणार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाशी येथे बेकायदेशीर पार्किंग शुल्क वसुली करणाऱ्या ठेकेदाराची चौकशी करून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश मालमत्ता विभागाचे उपायुक्त भागवत डोईफोडे यांनी वाशी विभाग अधिकारी यांना दिले आहे. यासोबतच तसेच संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याचे आदेश दिले आहेत.

वाशी सेक्टर ३०, प्लॉट नं.३६-ए वर महापालिकेच्या एका ठेकेदाराकडून बेकायदेशीर पार्किंग शुल्क वसुली केली जात होती. याविषयी तक्रार प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन उपायुक्त राहुल गेठे यांनी धाड टाकून कारवाई केली होती. तदनंतर याप्रकरणी तत्कालीन विभाग अधिकारी सागर मोरे यांना गुन्हा नोंद करण्याचे आदेश दिले होते.

या विषयी वाशी पोलीस, विभाग कार्यालय आणि उपायुक्त कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित ठेकेदारावर गुन्हा नोंद करण्यात आला नव्हता. त्यानंतर तक्रारदार संजय भवारी यांनी उपायुक्त भागवत डोईफोडे यांना निवेदन दिले होते. त्यानुसार डोईफोडे यांनी विभाग अधिकारी सुखदेव येडवे यांना या प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्यात यावी. तसेच संबंधित ठेकेदारावर गुन्हा सिध्द झाल्यास न.मुं.म.पा.च्या काळ्या यादीत टाकण्याच्या कारवाईसाठी अहवाल सादर करावा, असे आदेश दिले आहेत.

# फाईव्ह स्टार मित्र मंडळाचे वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे संकल्पाने वृक्षारोपण

**माणगांव: बातमीदार**

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे अस म्हणत माणगांव विकास कामात येथील अनेक भलेमोठे वृक्ष तोडले गेले तर काही नैसर्गिक आपत्ती, वादळाने हिरावून नेले. परिणामी येथे प्रचंड उष्णतामान वाढले, परिसरात रस्त्यालगत उन्हातान्हात क्षणभर सुखाची सावली कायमची नष्ट जाहली. आपण आपल्या वृक्ष मित्रांचा घात केल्याने दुष्काळ, प्रदूषणाचे संकट ओढवून घेतले, वृक्षवल्लींचा माणसाला विसर पडला, खरतर वृक्ष निसर्गाची फुफ्फुसे आहेत. हवेतील कार्बन डाय-ऑक्साइड शोषून 'प्राणवायू हवेत' सोडून हवा शुद्ध करण्याचे काम हेच परोपकारी वृक्ष करतात. यामुळेच माणसाचे जगणे सुखी झाले हेच महत्व अधोरेखित माणगांव मध्ये दिनांक ८ जुलै रोजी येथील नुकतेच नव्याने कार्यरत झालेल्या फाईव्ह स्टार मित्र मंडळ युवा सदस्यांनी या पावसाळ्यात वृक्षारोपणाचा थेट कार्यक्रम विविध शाळा, सोसायट्या, जंगल परिसरात एकत्र जाऊन संपन्न केला आहे. एकूण १२०० झाडे लावण्याचा संकल्प करीत स्तुत्य उपक्रम सुरु केला आहे.

या वृक्षारोपणास फाईव्ह स्टार मित्र मंडळाचे अध्यक्ष औदुंबर गायकवाड, कार्याध्यक्ष सुमित काळे, उपाध्यक्ष सागर गायकवाड, सचिव विजय उभारे, खजिनदार योगेश सुर्वे तसेच सदस्य मांगिरिष तेंडुलकर, रोहित काळे, प्रथमेश वेदक, सार्थक जाधव, चरण नवगावकर, आर्यन जंगम, प्रतिक जाधव, संदेश लाडगे, तेजस मोहिते, अमोल बुटे, कुणाल म्हात्रे, आयुष म्हात्रे, सुरज ढाकवळ, रितेश काळे, ऋश्वेद जाधव मोठ्या उत्साहात उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाने या सर्व युवकांची विशेष प्रशंसा केली आहे.



पान १ वरून

## राज्यात नागरी भागात तुकडेबंदी कायदा रद्द

मंत्री बावनकुळे म्हणाले, राज्य शासनाने ८ ऑगस्ट २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार, मुंबई शहर, मुंबई उपनगर, अकोला आणि रायगड जिल्हे वगळता राज्यातील इतर ३२ जिल्ह्यांमध्ये स्थानिक क्षेत्र घोषित करून बागायतीसाठी १० आर आणि जिरायतीसाठी २० आर इतके प्रमाणभूत क्षेत्र निश्चित केले आहे. यामध्ये महानगरपालिका व नगरपरिषदा हद्दीतील क्षेत्रांचा समावेश करण्यात आलेला नाही. धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत १९४७ च्या कायद्यातील कलम ७, ८ व ८अ नुसार स्थानिक क्षेत्रामध्ये जमिनीचे तुकडे निर्माण होणार नाहीत, अशा पद्धतीनेच हस्तांतरण करता येते. मात्र, १ जानेवारी २०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार विशेष नियोजन प्राधिकरण किंवा नगरविकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या, तसेच प्रादेशिक योजनेत अकृषिक वापरासाठी निश्चित केलेल्या जमिनी या कायद्याच्या तुकडेबंदीच्या नियमांपासून वगळण्यात आलेल्या आहेत.

तुकडेबंदी कायद्यामुळे अनेक व्यवहार प्रलंबित होते. नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. हा कायदा रद्द केल्यामुळे कमी क्षेत्राची खरेदी-विक्री करता येणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी महसूल विभाग व नगरविकास १ चे अपर मुख्य सचिव, जमाबंदी आयुक्त आणि नोंदणी महानिरीक्षक अशा चार अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती गठित केली जाणार आहे. याबाबत लोकप्रतिनिधीच्या सूचना असतील त्यांनी अपर मुख्य सचिव, महसूल यांच्याकडे लेखी स्वरूपात सात दिवसात पाठवाव्यात असेही मंत्री बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

## विद्यार्थ्यांनी जास्त मेहनत घेऊन अभ्यास करावा -अरुणशेठ भगत

तोंडरे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या वह्यांचे वाटप भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेंद्र पाटील, नेरे मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, अंकुश पाटील, माजी सरपंच राम पाटील, अशोक पाटील, वासुदेव पाटील, गाव अध्यक्ष धनाजी पाटील, लक्ष्मण पाटील, प्राजक्ता पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.



# खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने नेत्र शिबिर

**मुरुड : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राजपुरी ग्रामपंचायतचे उपसरपंच इस्माईल सिद्दिक यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली राजपुरी मुस्लीम मोहल्यात नेत्र तपासणी शिबिर ठेवण्यात आले होते.राजपुरी मुस्लिम महिल्यातील सुमारे १६५ लोकांची डोळे तपासणी होऊन १० लोकांना शस्त्रक्रियेसाठी वरिष्ठ दवाखान्यात ऍडमिट करण्यात आले आहे.

या डोळे तपासणी शिबिराचे उद्घाटन राजपुरी मुस्लिम समाज अध्यक्ष जुबेर सिद्दिक यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.यावेळी मुरुड तालुका राष्ट्रवादी अध्यक्ष फैरोज घलटे,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते मनोज भगत,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अजित कासार,सचिव विजय पैर,माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर,माजी उपसरपंच योगेंद्र गोयजी,राजपुरी ग्रामपंचायत सरपंच सुप्रिया गीदी, उपसरपंच इस्माईल सिद्दिक, ,डॉक्टर फौजेस,अतिक हदादि ,तरबेज कारभारी,राजपुरी मुस्लिम समाज अध्यक्ष जुबेर सिद्दिक,इकबाल सिरसीकर, लियाकत कासकर, मुजाहिद कासकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## दुखवटा

### सोमनाथ मोरे

**चौक :** विद्यार्थी घडविणारे आणि शाळे बरोबर शिक्षण संस्थेची वाटचाल प्रगती पथावर



नेणारा वावोशी हायस्कूलचे माजी शिक्षक सोमनाथ मोरे यांचे निधन झाले २७ वर्ष त्यांनी वावोशी हायस्कूलमध्ये अध्यापनाची सेवा केली.दरवर्षी पंढरीची वारी करणारे सोमनाथ मोरे यांच्यवार अत्यंसंस्कार पंढरपूर या त्यांच्या गावी केले. त्यांच्या मागे शिक्षक पत्नी, दोन मुलगे, विवाहित मुलगी असा परिवार आहे.

### जनाबाई कडू

**कर्जत:** मुद्रे (बुद्रुक) गावातील जनाबाई वामन कडू यांचे ८७ व्या वर्षी वार्धक्याने निधन झाले.



त्यांच्या पश्चात एक पुत्र, तीन मुली, सूना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे अंत्यसंस्कार मुद्रे गावासाठी नव्याने बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीत करण्यात आले. त्यामुळे ग्रामस्थांनी या स्मशानभूमीचे नवीन 'जनाबाई कडू वैकुंठ धाम' असे नवीन देण्याचा प्रस्ताव मांडला.

## निवडक

### अंघोळ करताना एकाचा मृत्यू

**पनवेल :** एक व्यक्ती त्याच्या घरासमोरील पाण्याच्या टाकीजवळ अंघोळ करीत असताना त्याला चक्कर येऊन त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील पारगाव येथे घडली आहे. राम प्रकाश राठोड (वय ३०) असे या मयत व्यक्तीचे नाव असून या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पार्क केलेल्या ट्रकची चोरी

**पनवेल :** पार्क करून ठेवलेल्या बारा चाकी ट्रकची चोरी झाल्याची घटना पळस्पे ते गव्हाण फाटा दरम्यान घडली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ चाकी ट्रक (एमएच ४६ बीयू ८४३१) हा व्यवस्थित रेस होत नसल्याने पळस्पे ते गव्हाण फाटा येथील टी पॉइंटच्या पुढे उभा करून ठेवला होता. काही दिवसानंतर चालक तेथे आला असता त्याला ट्रक दिसून आला नाही. २५ लाखांचा ट्रक चोरीला गेल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

### वृद्ध महिलेचा आढळला मृतदेह

**पनवेल :** एका वृद्ध महिलेचा मृतदेह उलवे परिसरात आढळून आला असून तिच्या नातेवाईकांचा शोध उलवे पोलीस करीत आहेत. महिलेचे अंदाजे वय ७० वर्षे, केस अर्धवट काळे पांढरे, बांधा सड पातळ, रंग कला, उंची अंदाजे ४ फूट असून अंगात गुलाबी रंगाचा मध्ये निळ्या रंगाची नक्षी असलेला गाऊन डोक्या खाली निळसर गुलाबो रंगाची ओढणी आहे तसेच दोन्ही हातात लोखंडी कडा आहे. या वृद्ध महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवा पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक आशुतोष देशमुख (८९९९८९२१५४) येथे संपर्क साधावा.

### डॉक्टरला ८८ हजारांचा गंडा

**पनवेल :** पनवेल शहरातील एका डॉक्टरची ८८,०० रुपयांची फसवणूक झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६० वर्षीय डॉक्टर हे घरी असताना त्यांना त्यांच्या मोबाईवर एक मेसेज आला त्यात पॅकेज डिलीव्हरी बाबत सांगून लिंक पाठवून त्या मध्ये माहिती भरण्यास सांगितले व अजून काही लिंक व प्रोसेसिंग सांगून त्यांच्या बँक खात्यातून ८८,७९० रुपये रक्कम ही दुसऱ्या खात्यात वळती झाल्याचे त्यांना समजले. त्यानुसार त्यांनी तक्रार दाखल केली आहे.

### केबलसह इलेक्ट्रिक मोटरची चोरी

**पनवेल :** गोडाऊनच्या शटरजवळील पत्रा तोडून चोरांनी इलेक्ट्रिकचे पावर केबलचे बंडल आणि चार इलेक्ट्रिक मोटर चोरून नेल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील किरवली-अडिवली गाव धानसरगाव फाटा मुंब्रा-पनवेल रोड सद्गुरु वजन काट्या जवळ असलेल्या शटरजवळील पत्रा चोरांनी तोडला आणि आतमध्ये प्रवेश करून केबल बंडल आणि चार इलेक्ट्रिक मोटर असा एकूण सव्वा लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

### दोन मोबाईल फोनची चोरी

**पनवेल :** रिसेप्शन काउंटरच्या खुर्चीवर बसलेल्या असताना अनोळखी व्यक्तीने दोन मोबाईल फोनची चोरी केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिमा फडके या चिखले येथे राहत असून त्या पनवेलमधील डॉ. टकले हॉस्पिटलमध्ये रिसेप्शनिस्ट आहेत. त्या रिसेप्शन काउंटरच्या खुर्चीवर बसल्या होत्या. या वेळी एका अनोळखी व्यक्तीने बसलेल्या महिलेसोबत आले असल्याचे सांगितले. त्यानंतर प्रतिमा फडके डॉक्टरांच्या केबिनमध्ये गेल्या. केबिनमधून परतल्यानंतर काउंटरवरील मोबाईल दिसले नाहीत. सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता तो अनोळखी व्यक्तीने मोबाईल चोरल्याचे दिसले.

# चिरनेर परिसरात वाहने चोरणारी टोळी सक्रिय


**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर परिसरात वाहने चोरणारी टोळी सक्रिय झाली असून, अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत, चिरनेर गावातील महादेव परदेशी व अविनाश म्हात्रे यांच्या मोटरसायकल चोरण्याचा प्रयत्न केला. यात त्यांना महादेव परदेशी यांची मोटरसायकल चोरून नेण्यात यश आले आहे. तर अविनाश म्हात्रे यांची मोटरसायकल चालू न झाल्यामुळे त्यांनी चिरनेर दिघाटी मार्गावरील रस्त्याच्या कडेला टाकून, पळ काढला. ही घटना काल ७ जुलै रोजी पहाटेच्या साडेचारच्या सुमारास घडली आहे.

याबाबत उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिस यंत्रणा अज्ञात चोरट्यांचा शोध घेत आहेत. तर याच रस्त्यावरील ३ किमी अंतरावरील पनवेल तालुक्यातील दिघाटी गावातही अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत घरातील रोकड लंपास केली. पोलीस यंत्रणा चोरट्यांचा शोध घेत आहेत.

चिरनेर-दिघाटी या मार्गाच्या बाजूला घरे बांधून महादेव परदेशी व अविनाश म्हात्रे हे गेली अनेक वर्ष वास्तव्य करीत आहेत. नेहमीप्रमाणे त्यांनी आपल्या अंगणात रात्री मोटरसायकली पार्किंग करून ठेवल्या होत्या, मात्र अज्ञात चोरट्यांनी या संधीचा फायदा घेत या मोटरसायकली चोरण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना महादेव परदेशी यांची मोटरसायकल चोरून नेण्यात यश आले आहे, मात्र अविनाश म्हात्रे यांची मोटरसायकल त्यांना चालू न झाल्यामुळे त्यांनी ती रस्त्याच्या कडेला पावसाळ्यातील वाढलेल्या झूडपात टाकून, पळ काढला.

एकंदरीत चोरट्यांना वाहने चोरल्यानंतर या मुख्य रस्त्यावरून सुसाट वेगाने पळून जाता यावे, हा उद्देश समोर ठेवून त्यांनी हा प्लॅन केला होता. अशी चर्चा चिरनेर गावातील नागरिकांच्या चर्चेतून ऐकावयास मिळत आहे. या अज्ञात चोरट्यांमुळे चिरनेर गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत उरण पोलीस अधिक तपास करीत आहेत.



## महिलेची २१ लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

क्रिप्टोमध्ये पैसे इन्व्हेस्ट केल्यास नफा होईल असे सांगून २१ लाख ४५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी सुधाकर संजीव मगविरा (राहणार खोपट, ठाणे) यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

शिल्पा शेट्टी या खारघर येथे राहत असून, त्यांना सुधाकर मगविरा यांनी क्रिप्टोमध्ये पैसे इन्व्हेस्ट करण्यास सांगून त्यात नफा होणार असल्याचे सांगितले. त्यांनी आयडी बनवून एक लाख इन्व्हेस्ट केले तर तीन लाख रुपये नफा होईल, असे सांगितले. त्यानुसार शेट्टी यांनी २१ लाख ४५ हजार रुपये गुंतवले. सात महिन्यांपासून त्याने काही पैसे दिले नाहीत. त्याच्या राहत्या घरी गेले असता त्याने 'तुमचे सर्व पैसे परत करू,' असे आश्वासन दिले. गुंतवलेले पैसे परत मागितले असता पैसे काढता येणार नाहीत, असे बोलून उडवाउडवीची उत्तरे दिली. पुन्हा पैशांची मागणी केली असता चार्जेस भरा; मग पैसे परत करतो, असे सांगून पैसे देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर फोन घेणे बंद केले; तसेच मेसेजनाही प्रतिसाद दिला नाही. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला.

## उसर्ली ते विचुंबे रस्त्याचे काम मार्गी

### ग्रामस्थांच्या मागणीनुसार सिडकोच्या अधिकाऱ्यांकडून पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उसर्ली खुर्द येथील उसर्ली ते विचुंबेकडे जाणारा रस्त्याचे तब्बल दोन वर्षांपासून रखडले होते, मात्र हे काम मार्गी लागणार असल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.



गेल्या ३० ते ४० वर्षांपासून केवळ पायवाट असलेला हा रस्ता, २०१३-१४, २०१९-२०, आणि २०२१-२२ या वर्षांत जिल्हा नियोजन योजनेतून एकूण ७३ लाख ८२ हजार रुपये खर्च करून तयार करण्यात आला होता. विशेष म्हणजे, २०२४-२५ मध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आमदार निधीतूनही या रस्त्यासाठी निधी मंजूर झाला होता.

मात्र, एका शेतकऱ्याने अडथळा निर्माण केल्यामुळे गेल्या दोन वर्षांपासून हे काम रखडले होते. परिणामी, हा महत्त्वाचा रस्ता पूर्णपणे नादुरुस्त झाला होता, ज्यामुळे ग्रामस्थ, विद्यार्थी आणि वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ग्रामपंचायतीने यावर तोडगा काढण्यासाठी सिडको कार्यालयाकडे वारंवार पत्रव्यवहार केला. ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत, सिडकोच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर येऊन पाहणी केली. त्यानंतर, सोमवारी भूमी अभिलेख अधिकाऱ्यांनी जागेवर येऊन भूखंड क्रमणकची सीमा निश्चित केली.

या पाहणीनंतर, सरपंच आणि सदस्यांनी ग्रामस्थांना आश्वासन दिले आहे की, हा रस्ता लवकरच मोकळा करून त्याचे काम तातडीने पूर्ण केले जाईल. यामुळे गेली दोन वर्षे रखडलेल्या रस्त्याच्या कामाला आता गती मिळेल, अशी अपेक्षा आहे. या वेळी उसर्ली गावाचे सरपंच, सदस्य आणि अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## खारघर कोपरा ब्रीज परिसरात वृक्षारोपण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका उद्यान विभाग आणि गुडविल पॅराडाईज व जय दुर्गा फेरीवाला माता मंडळ सेक्टर १५ खारघर यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकतेच खारघर सेक्टर १५ कोपरा ब्रीज नाल्याच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त श्री. मंगेश चितळे, मा. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे.

या कार्यक्रमांतर्गत खारघर सेक्टर १५ कोपरा ब्रीज नाल्याच्या परिसरात पनवेल महानगरपालिकेचा उद्यान विभाग आणि गुडविल पॅराडाईज व जय दुर्गा माता फेरीवाला माता मंडळ सेक्टर १५ खारघर यांच्या मार्फत आंबा, जांभूळ-बहाडोली, पेरू, बहावा, कांचन, कडुनिंब अशा विविध प्रकारच्या ५० वृक्षांचे रोपण करण्यात आले.

सहायक आयुक्त डॉ. रूपाली माने व उद्यान विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागातील उद्यान पर्यवेक्षक नितीन राठोड, पर्यवेक्षक रुपेश चित्रुक, वैभव ठाकरे यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.



**पनवेल : महापालिकेच्या शाळा क्रमांक २ दगडी शाळा येथे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने मोफत वह्यावाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, मुख्याध्यापक सुजित म्हात्रे, कमल तायडे, वैभव पाटील, वैशाली सावळे, अर्चना माने, स्वाती पाटील आदींसह शिक्षण, विद्यार्थी उपस्थित होते.**

## उरणमध्ये स्वामी समर्थ मठात गुरुपौर्णिमेनिमित्त कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

उरण शहरातील आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा संघ यांच्या वतीने श्री स्वामींच्या मठात गुरुवारी (दि.१०) गुरुपौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

या दिवशी सकाळी ८ वाजता आरती, ८.१५ वाजता अभिषेक, सकाळी ९ ते १० वाजेपर्यंत सारामृत, १०.३० वाजता आरती, संध्याकाळी ६.३० वाजता आरती, सकाळी ६.३० ते रात्री १० वाजेपर्यंत स्वामी सेवकांनी दर्शनाचा व तिर्थ प्रसादाचा लाभ घ्यावा, अशी विनंती आयोजकांनी केली आहे.





## अभिनंदन....!

**पनवेल : गेल्या अनेक वर्षांपासून भाजपचे ज्येष्ठनेते अरुणशेठ भगत यांनी पक्षाच्या निष्ठावान, जागरूक आणि कार्यक्षम कार्यकर्त्यापासून ते एक प्रेरणादायी नेतृत्व असा प्रवास केला आहे. त्याच्या कार्याची दखल घेत त्यांची भाजपच्या राज्य परिषद सदस्य पदी निवड झाली आहे. त्यानिमीत्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह अनेक मान्यवरांनी पुष्पगुच्छ देऊन अरुणशेठ भगत यांचे अभिनंदन केले.**

## संपादकीय

# तारतम्य हवेच

शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कर्मचाऱ्याला मारहाण करून आमदार म्हणून स्वत:ची व सभागृहाची प्रतिष्ठा कमी केली आहे. त्यांच्यावर मारहाणीबद्दल टीका झाली तशीच ते बनियन-टॉवेलवर दिसल्याबद्दलही तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. हे स्वाभाविकच आहे.

**गेल्या आठवड्यात मनसेच्या कार्यकर्त्यांनी मिरा-भाईंदरमध्ये दुकानदाराला मराठीत बोलत नाही म्हणून मारहाण केली तर बुधवारी चर्चेत आली ती शिवसेना शिंदे गटाचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कँटिनमधील कर्मचाऱ्याला मारहाण केल्याची घटना. या मारहाणीचा व्हिडिओ मंगळवारपासूनच व्हायरल झाला होता. निकृष्ट जेवण दिल्याबद्दल संजय गायकवाड यांनी कँटिनमधील कर्मचाऱ्याला मारहाण केली. वेगवेगळ्या कारणांवरून संजय गायकवाड नेहमीच वादात अडकताना दिसतात. आपल्याला देण्यात आलेले जेवण निव्वळ निकृष्ट नव्हे तर सडलेले होते. त्यामुळे आपली अशी प्रतिक्रिया आली असे गायकवाड यांनी त्यासंदर्भात नंतर सांगितले असले तरी यामुळे विरोधकांना आयतेच कोलित मिळाले. त्यांनी विधिमंडळात या प्रकरणावरून गायकवाड यांच्यावर चांगलाच हल्लाबोल केला. गायकवाड यांनी कर्मचाऱ्याला मारहाण केली यावर जशी टीका झाली, तशीच ते बनियन आणि टॉवेलवर खाली आल्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात आली. आमदारांनी कसे रहावे याचे काही संकेत आहेत वा नाहीत असा सवाल ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी यासंदर्भात सभागृहात विचारला. लोकप्रतिनिधी म्हणून कुठल्याही नेत्याचा पोशाख विशिष्ट सभ्यतेचे पालन करणारा असावा अशी अपेक्षा कुणी व्यक्त करीत असेल तर ते गैर नक्कीच म्हणता येणार नाही. तसेच लोकप्रतिनिधी म्हणजे कुणी सामान्य कार्यकर्ता नव्हे. त्याने तारतम्य गमावून कसे चालेल? त्यामुळे अशा लोकांच्या पाठिंब्यावर तुम्ही राहणार का, असा सवाल करत, गायकवाड यांना निलंबित करण्याची मागणी विरोधकांनी केली. यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपण या प्रकरणाची माहिती घेतली आहे. असे वर्तन योग्य नाही अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. अशाप्रकारच्या वर्तनामुळे सभागृहाची व आमदार म्हणून आपली प्रतिष्ठा कुठे तरी कमी होते. आमदार निवासातील सोयी नीट नव्हत्या, भाजीला वास होता, या सगळ्या गोष्टींची तक्रार करता येते. आमदार निवासात जर काहीही अनियमितता असेल तर स्वतंत्रपणे त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. परंतु अशा परिस्थितीबद्दल लोकप्रतिनिधीने मारहाण करणे, त्याचे व्हिडिओ येणे हे चुकीचेच आहे. यातून सगळया आमदारांविषयी लोकांमध्ये चुकीची भावना निर्माण होते. आपण सत्तेचा गैरवापर करतो, आपले वर्तन योग्य नाही असा संदेश जातो. म्हणूनच ही अतिशय गंभीर बाब आहे, असे स्पष्ट प्रतिपादन फडणवीस यांनी यासंदर्भात केले आणि सभापती महोदय व अध्यक्ष महोदय या दोघांनी याची दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, असे मुख्यमंत्री म्हणाले. या घटनेसंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही, आपण संजय गायकवाड यांना समज देऊ. अशातऱ्हेची मारहाण ही समर्थनीय नाहीच असे उद्गार काढले. उद्धव ठाकरे यांनी मात्र हे प्रकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बदनामी करण्याकरिता काढले गेले असावे असे अजब उद्गार काढले. दरम्यान, आमदार निवासातील कॅन्टीनमधील पनीर, तेल आदी खाद्यपदार्थ बुधवारी एफडीए अर्थात अन्न व औषध प्रशासनाने तपासणीकरिता ताब्यात घेतले असून लवकरच त्याविषयीचा अहवाल हाती येईल व पुढील कारवाई होऊ शकेल.**

# गुरूपौर्णिमा : गुरूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस

'गुरूपौर्णिमा' हा भारतातील एक महत्त्वाचा सण आहे. आषाढ महिन्यातील शुद्ध पौर्णिमेला गुरूपौर्णिमा साजरी केली जाते. भारतीय संस्कृतीत गुरूला देवाप्रमाणे मानले जाते. म्हणूनच गुरूपौर्णिमेला गुरूपूजन आणि गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा केले जाते. भारतात अनेक शाळा, कॉलेज आणि संप्रदायांमध्ये गुरूपौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि श्रद्धापूर्वक साजरी केली जाते. शिक्षक दिनाच्या शुभेच्छा सोबतच हा दिवसही शिक्षकवर्गासाठी फार महत्त्वाचा असतो.

गुरूपौर्णिमेला व्यासपौर्णिमा असंही म्हणतात. कारण महर्षी व्यासांनी वेदांचे ज्ञान जगासमोर उघड केले. व्यासांना भारतीय संस्कृतीमध्ये आद्यगुरू समजले जाते. व्यासांनी महाभारत हा अलौकिक ग्रंथ लिहीला. महाभारतातून व्यासांनी सांगितलेल्या धर्मशास्त्र, नितीशास्त्र, मानसशास्त्र आणि व्यवहारशास्त्राचे दर्शन घडते. तिथीनुसार हा दिवस महर्षी व्यासांचा जन्मदिवस असल्यामुळे या दिवसाला एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणूनच गुरूपौर्णिमेला व्यासपूजन देखील केले जाते.

भारतात पूराण काळापासून गुरू-शिष्य परंपरा आहे. पूर्वीच्या काळी शिष्य गुरूकडे आश्रमात राहत असत. त्याकाळी शिष्य स्वतःचे घर सोडून गुरूगृही राहत असत. ज्ञानसंपादनासाठी शिष्याला सुखवस्तू जीवनाचा त्याग करावा लागत असे. ज्ञानप्राप्तीनंतर गुरूला गुरूदक्षिणा देण्यासाठी गुरूपौर्णिमा साजरी केली जात असे. आता मात्र गुरूकुल परंपरा कमी झाली आहे. मात्र गुरूकडून ज्ञान घेण्याची प्रथा आजही तशीच आहे. त्याचप्रमाणे जीवनातील चांगल्या अथवा कठीण प्रसंगी आजही आपल्या गुरूकडून मार्गदर्शन घेण्यासाठी आजही शिष्य आपल्या गुरूंची भेट घेतात. तिथीनुसार आषाढ महिन्यातील शुद्ध पौर्णिमेला 'गुरूपौर्णिमा' साजरी केली जाते. या वर्षी '१३ जुलै' ला गुरूपौर्णिमा असून अनेक ठिकाणी मोठ्या श्रद्धेने गुरूपौर्णिमा साजरी केली जाणार आहे.

शाळा, कॉलेज, व्यवसायक्षेत्रातील शिष्य या दिवशी आपल्या गुरूंची कृतज्ञता व्यक्त करतात. वर्षभर अथवा आयुष्यभर गुरूनी दिलेल्या ज्ञान आणि मार्गदर्शनामुळे शिष्य जीवनात यशस्वी होत असतात. गुरू हे ईश्वराचे रूप असून प्रत्यक्ष भगवंत गुरू रूपाने आपल्या जीवनाचे सारथ्य करत आहे अशी ज्या शिष्याची भावना असते. त्या शिष्याची जीवनात लवकर प्रगती होते. शिक्षक अथवा गुरूंनी शिकवलेले ज्ञान आत्मसात करून त्याप्रमाणे आचरण करण्याचा ते प्रयत्न करत असतात. आयुष्यात चांगला गुरू मिळणं हे भाग्याचं लक्षण समजलं जातं. कारण ज्याच्या आयुष्यात गुरू असतो त्याला त्याच्या गुरूकडून जीवनात चांगल्या वाईट सर्वच गोष्टींना सामोरं जाण्याचं आत्मबळ मिळत असत.

गुरू म्हणजे 'मार्गदर्शक' आणि 'पौर्णिमा' म्हणजे प्रकाश. गुरू कडून मिळालेल्या ज्ञानाने जीवन प्रकाशमय होते. गुरूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. प्रत्येकाच्या आयुष्यात कोणीतरी गुरू हा असतोच. सर्वांच्या आयुष्यातील प्रथम गुरू म्हणजे 'आई'. कारण सर्वात पहिली संगत आपल्याला आईची लाभते. आई आपल्याला चालायला, बोलायला आणि जगायला शिकवते. जगातील प्राथमिक ज्ञान आपण आपल्या प्रथम गुरू म्हणजेच आईकडून घेतो. एवढंच नाहीतर आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आई आपली मार्गदर्शक असते. आई प्रमाणेच वडील आणि पुढे अनेक शिक्षक, मित्र, चांगली पुस्तके आपली गुरू असू शकतात. गुरूची महती थोर असते म्हणूनच लहानपणापासून आपल्याला 'आचार्य देवो भवः' ही शिकवण दिली जाते. गुरू अथवा शिक्षक हा देवाप्रमाणे असतो या शिकवणीमुळेच भारतात गुरूपौर्णिमा आजही मनापासून आणि श्रद्धापूर्वक साजरी केली जाते.



गुरूपौर्णिमेला 'गुरूपूजन' करण्याची पद्धत आहे. गुरूपूजन म्हणजे गुरूंची पाद्यपुजा करणे. मात्र गुरूपूजन म्हणजे केवळ गुरूची पाद्यपुजा करणे अथवा गुरूला वाकून नमस्कार करणं असं मुळीच नाही. गुरूला नमस्कार करणे अथवा गुरूंचा आदर राखणे हे जरी महत्त्वाचं असलं तरी हे खरं गुरूपूजन नक्कीच नाही. कारण खऱ्या गुरूला अशा दिखाव्याची मुळीच गरज नसते. गुरूपूजनाचा खरा अर्थ आपल्या गुरूने दिलेलं ज्ञान आत्मसात करणं. गुरूंकडून मिळवलेलं ज्ञान आचरणात आणण्याचा प्रयत्न करणं. गुरूने दिलेल्या ज्ञानामुळे आपलं जीवन यशस्वी झालं यासाठी सतत गुरू बद्दल कृतज्ञ असणं. या कृतज्ञतेपोटी गुरूंची सेवा आणि आदर करणं म्हणजे खरं गुरूपूजन. अशा प्रकारच्या गुरूपूजनातून गुरूला खरी गुरूदक्षिणा मिळत असते. कारण जेव्हा शिष्याची प्रगती होते तेव्हा ती पाहून गुरूला खरा आनंद होत असते. खऱ्या गुरूसाठी हा एक प्रकारचा सन्मानच असतो. आजकाल सोशल मीडियामुळे गुरुपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा ही आवर्जून शेअर केल्या जातात.

गुरूचे बदलत जाणारे स्वरूप -आई, वडील आणि शिक्षकांप्रमाणे माणसाला जीवनात आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी आध्यात्मिक गुरूंची देखील गरज असते. खरे गुरू तेच असतात जे शिष्याला त्याचे जीवन आणि संसार सुखाचा करण्यासाठी योग्य आणि अचूक मार्गदर्शन करतात. अशा गुरूंना शिष्य सदगुरूंचा मान देतात. मात्र आजकाल गुरू मार्ग दाखविण्याऐवजी व्यवहार करून शिष्यांची फसवणूक करतानाच जास्त दिसतात. त्याच प्रमाणे स्वतःजवळील अपूऱ्या ज्ञानातून शिष्याचा बुद्धीभेद करणारे गल्लाभरू गुरू गल्लोगल्ली निर्माण झाले आहेत. अशा प्रकारच्या गुरूंची संख्या दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळे खरे गुरू अथवा सदगुरू ओळखणे कठीण झाले आहे. यासाठी शिष्याने गुरूची ओळख पटविण्यासाठी भोळसट भावापेक्षा तर्कशुद्ध बुद्धीचा वापर करावा.

गुरूचे कार्य हे एक महान कार्य आहे. आपल्या शिष्यांच्या भल्याचा विचार करून त्यांना आपल्याजवळील ज्ञान आणि अनुभव निरपेक्षपणे आणि प्रामाणिकपणे देणे हे गुरूचे खरे कार्य असते. ज्ञान देताना गुरूची भावना ही अहंकाराची नसावी. या ज्ञानाने आपल्या शिष्याच्या जीवनाचे कल्याण होणार आहे अशी भावना गुरूकडे असावी. कारण जेव्हा गुरूने दिलेल्या ज्ञानाने शिष्याची प्रगती होते तेव्हा ती प्रगती पाहून जर गुरूला आनंद आणि समाधान झाले तरच तो खरा गुरू जाणावा. शिष्याला जितकी गुरूची गरज असते तितकीच गुरूला देखील शिष्याची गरज असते. जर शिष्यच नसेल तर गुरू आपले ज्ञान कोणाला देणार. म्हणूनच गुरूने देखील आपल्या शिष्याबद्दल कृतज्ञ असावे.

गुरूकडून मिळालेले ज्ञान नम्रपणे स्विकारतो त्या शिष्याला गुरूकडून मिळालेले ज्ञान जसेच्या तसे मिळते. कारण ज्ञान ग्रहण करताना शिष्याकडे नम्रपणा नसेल तर गुरूकडे शिष्याबद्दल प्रेम आणि आपलेपणा असूनही शिष्याला समजावणे गुरूला कठीण जाते. कारण ज्ञानप्राप्तीमध्ये शिष्याचा अंहकार अडथळा निर्माण करत असतो. यासाठीच शिष्याची गुरूवर मनापासून श्रद्धा असणं गरजेचं आहे. त्याचसोबत गुरूकडून मिळवलेलं ज्ञान आपल्या जीवनात आचरणात आणण्याचा शिष्याने तंतोतंत प्रयत्न करणे देखील गरजेचे आहे. असे केल्यास शिष्याच्या पाठी गुरूच्या ज्ञानाचे बळ आणि साधना निर्माण होते आणि त्याची आयुष्यात प्रगती होत जाते.


भारतात प्राचीन काळापासून गुरू-शिष्य परंपरा आहे. कृष्ण-अर्जुन, अर्जून- द्रोणाचार्य, एकलव्य- द्रोणाचार्य, चाणक्य- चंद्रगुप्त अशी अनेक उदाहरणे पुराणात सापडतात. असं म्हणतात की, अर्जुन कृष्णाचा इतका मोठा भक्त होता की त्याच्या अंगातील केसांमधून देखील कृष्णाच्या नामाचा जप ऐकू येत असे. कृष्णाच्या मार्गदर्शनानुसार अर्जुनाने आचरण केल्यामुळे महाभारतात पांडवांचा विजय झाला. रामकृष्ण परमहंस - स्वामी विवेकानंद, रामदास स्वामी- शिवाजी महाराज ही उदाहरणे देखील गुरू-शिष्यासाठी प्रसिद्ध आहेत. त्याच प्रमाणे अलीकडच्या काळातील सचिन तेंडूलकर आणि आचरेकर सर ही गुरू शिष्याची जोडी देखील फार लोकप्रिय आहे. क्रिकेटप्रेमी सचिनला क्रिकेटचा देव मानतात. मात्र सचिनच्या व्यक्तिमत्त्वाला खरे पैलू त्याच्या गुरूंमुळे मिळाले. रमाकांत आचरेकर सरांनी दिलेल्या प्रशिक्षणामुळे सचिन तेंडूलकर हे नाव लोकप्रिय झाले. कलेच्या क्षेत्रात तर अनेक वर्षांची साधना गुरू आपल्या शिष्यासाठी पणाला लावत असतो. गायन क्षेत्रातही अनेक गायकांच्या गुरूंवरून त्यांच्या गाण्याचे घराणे ठरत असते. लोक आहेत. थोडक्यात जीवनात गुरूशिवाय तरणोपाय नाही हेच यावरून सिद्ध होते.

**साभार - इंटरनेट**

## बदलते तंत्रज्ञान

### इंटरनेटशिवाय करता येणार बिटचॅटद्वारे चॅटिंग

ट्विटर आणि ब्लॉक सारख्या कंपन्यांचे संस्थापक जॅक डोर्सी पुन्हा एकदा तंत्रज्ञानाच्या जगात धुमाकूळ घालण्यासाठी सज्ज झाले आहेत. यावेळी त्यांनी एक असे ॲप आणले आहे, जे इंटरनेटशिवाय मोबाईल नंबरशिवाय आणि ईमेलशिवाय चॅटिंग करण्यास सक्षम आहे.



या ॲपचे नाव Bitchat आहे. हे ॲप एक डिसेंट्रलाइज्ड मेसेजिंग सिस्टीम आहे, जे ब्लूटूथ लो एनर्जी (बीएलई) तंत्रज्ञानावर काम करते.

बिटचॅट हे एक मोबाइल मेसेजिंग ॲप आहे, जे इंटरनेट किंवा मोबाईल नेटवर्कशिवाय काम करेल. हे पीअर-टू-पीअर मेसेजिंगला सपोर्ट करते. याचा अर्थ असा की, एक मोबाइल थेट दुसऱ्या मोबाईलशी कनेक्ट होतो आणि मेसेज पाठवतो. हे ॲप जॅक डोर्सीचा वीकेंड प्रोजेक्ट मानले जातोय, परंतु या तंत्रज्ञानाने आणि संकल्पनेने सर्वांना आश्चर्यचकित केले आहे.

**बिटचॅट कसे काम करते?**

बिटचॅट ब्लूटूथ मेश नेटवर्कद्वारे डिव्हाइस-टू-डिव्हाइस कनेक्शन तयार करते. हे नेटवर्क ३०० मीटरपेक्षा जास्त अंतरावर काम करते.

मेसेज multi-hop सिस्टमद्वारे पाठवले जातात. म्हणजेच जर दोन डिव्हाइसेस दूर असतील तर मेसेज इतर मोबाइल डिव्हाइसद्वारे फॉरवर्ड केला जातो.

मेसेज युजरच्या डिव्हाइसवर तात्पुरत्या मेमरीमध्ये सेव्ह केला जातो. जर रिसिव्हर ऑफलाइन असेल, तर मेसेजनंतर वितरित केला जातो.

**बिटचॅटचे सुरक्षा धोरण काय आहे?**


एंड-टू-एंड एन्क्रिप्शन: Curve25519 + AES-GCM² अल्गोरिथमद्वारे डेटा पूर्णपणे सुरक्षित राहतो. फोन नंबर किंवा ईमेल आवश्यक नाही: यामध्ये मोबाइल नंबर किंवा ईमेल आवश्यक नाही, म्हणजेच ते पूर्णपणे खाजगी आहे.

सर्व्हर नाही, केंद्रीय नियंत्रण नाही : कोणताही केंद्रीय सर्व्हर नाही, म्हणून ॲप सेन्सॉरशिप-मुक्त आहे आणि नेटवर्क ब्लॉकिंगपासून पूर्णपणे सुरक्षित आहे.

**सध्या बिटचॅट कुठे उपलब्ध आहे?**

सध्या हे ॲप Apple TestFlight द्वारे ळजड वापरकर्त्यांसाठी बीटा व्हेर्जनमध्ये लॉन्च केले गेले आहे. बीटा ॲक्सेसनंतर ते येत्या काळात अँड्रॉइड आणि इतर प्लॅटफॉर्मवर देखील आणले जाऊ शकते.

# इतिहासकार डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर



## निमित्त

गोव्यातील एक प्रसिद्ध इतिहासकार डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयीचा लेख... पांडुरंग पिसुर्लेकर यांचा जन्म ३० मे १८९४ रोजी गोव्यातील शेणवी कुटुंबात पिसुर्ले (ता. सत्तरी) येथे झाला.

आईचे नाव कृष्णाबाई. त्यांचे शिक्षण साखळी व पणजी येथे झाले. शिक्षकीपेशाचे प्रशिक्षण व वकिलीचे शिक्षण घेऊन सुरुवातीस त्यांनी बिचोली येथे प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून काम केले. बोरकर कुटुंबातील रमाबाई यांच्याशी १९१३ साली त्यांचा विवाह झाला. लीलावती ही त्यांची मुलगी. रमाबाई १९६३मध्ये मरण पावल्या.

पिसुर्लेकरांचे सर्व शिक्षण पोर्तुगीज भाषेमधून झाले होते; तथापि त्यांना इंग्रजी, फ्रेंच, कोकणी, संस्कृत या भाषा तसेच मोडी लिपी चांगल्या प्रकारे अवगत होती. त्यांचे लेखन मुख्यत्वे मराठी व पोर्तुगीज या दोन भाषांतच आढळते. शिक्षकीपेशानंतर त्यांनी पणजीच्या अभिलेखागारात काम पतकरले (१९३१). या अभिलेखागाराच्या संचालकपदावरून ते १९६१मध्ये निवृत्त झाले. पिसुर्लेकरांनी या अभिलेखागाराखालील दप्तरखाना सुधारला; त्यातील कागदपत्रे खंडवार लावली आणि त्यासंबंधी सूची व दोन मार्गदर्शिका प्रसिद्ध केल्या. गोवा स्वतंत्र झाल्यानंतर मुंबई विद्यापीठाने पणजी येथे इतिहास संशोधन केंद्र स्थापन केले. त्याचे संचालकपद पिसुर्लेकरांकडे होते.

पिसुर्लेकरांनी स्फुटलेख व शोधनिबंध यांव्यतिरिक्त अनेक पुस्तके लिहिली. त्यांचे लेखन मुख्यत: पोर्तुगीज भाषेत असून त्याचे मराठी व इंग्रजी भाषांत भाषांतर झाले आहे. त्यांचे पुढील ग्रंथ महत्त्वाचे आहेत : अ आन्तीग् ईन्दिय् ई ऊ मून्दु इश्तेर्नु (१९२२), आश्पॅक्तुश् दा सिव्हिलिझासांव् दा ईन्दिय् आन्तीग् (१९२४), पुर्तुगेझिश् ई मारातश् (१९२६-३९), रेजिमॅन्तुश् दश् फोर्तालेझस् दा ईन्दिय् (१९५१), आर्जॅन्तिश् दा दिप्लोमासीय पुर्तुगेझ ना ईन्दिय् (१९५२), आस्सेन्तुश् दु कोंसेल्यु दु इश्तादु दा ईन्दिय् (१९५३-५७). यांखेरीज त्यांनी अनेक पोर्तुगीज कागदपत्रे प्रसिद्ध केली. अ आन्तिगिदादि दु क्रिश्नाईज्मु या पुस्तकात कृष्णसंप्रदाय हा इसवी सनापूर्वीपासून अस्तित्वात होता, हे सिद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्यांचा पोर्तुगेज-मराठे संबंध अर्थात पोर्तुगेजांच्या दप्तरांतील मराठ्यांचा इतिहास (१९६७) हे पुस्तक महत्त्वाचे असून मराठ्यांच्या इतिहासावर त्याने नवीन प्रकाश टाकला आहे.

पिसुर्लेकरांना लेखनसंशोधनाबद्दल अनेक मानसन्मान मिळाले. पोर्तुगाल शासनाने त्यांना नाइट ऑफ द मिलिटरी ऑर्डर ऑफ सँटिएगो हा किताब दिला (१९३५). याशिवाय रॉयल एशिटिक सोसायटी (बंगाल) आणि एशिटिक सोसायटी (मुंबई) यांनी त्यांना सुवर्णपदके दिली (१९४८ व १९५३).

लिस्बन विद्यापीठाने डी. लिट्. ही सन्मान्य पदवी त्यांना देऊन त्यांचा यथोचित गौरव केला. कर्करोगाने ते पणजी येथे १० जुलै १९६९ रोजी निधन पावले.

**(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### पावसाळ्यात साचलेल्या घाण पाण्यात जपून चाला

पावसाळ्यात सर्दी-खोकला आणि ताप यांसारखे संसर्गजन्य आजार होत असतात. या काळात रस्त्यावर साचलेलं पाणी आणि अस्वच्छतेमुळे लेप्टोस्पायरोसिस या संसर्गजन्य आजाराचा धोकादेखील वाढतो.



पावसाळा सुरु झाला की, अनेक साथीचे रोग आपले डोके वर काढतात. रस्त्यावर साचलेल्या पाण्यात पाय जरा जपूनच टाकायला हवे. अनेकदा चिखलामुळे किंवा घाणीमुळे पाय खराब झाल्यामुळे आपण सहज त्या डबक्यात पाय घालतो, परंतु याचा गंभीर परिणाम आपल्याला सहन करावा लागू शकतो. इतकेच नाही तर लहान मुले या डबक्यात उड्या मारतात, पण यामुळे लेप्टो नावाचा संसर्गजन्य आजार होण्याची अधिक शक्यता असते.

उंदीर आणि घुशींच्या मलमूत्रातून लेप्टो नावाचा संसर्गजन्य आजार हा साचलेल्या पाण्यातून माणसांपर्यंत पोहचतो. त्यामुळे पावसाळ्यात साचलेल्या पाण्यात पाय न बुडवणे आणि वैयक्तिक स्वच्छता न राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असा सल्ला डॉक्टरांनी दिला. आपल्या पायाला कोणतीही जखम झाली असेल आणि त्यावर उंदराचे मलमूत्र मिसळलेल्या पाण्याच्या संपर्कात आपण आल्याने लेप्टो नावाचा आजार होऊ शकतो. या साथीच्या आजाराचा सामना करण्यासाठी उपाययोजनाही आहेत.

**आजारांची लक्षणे काय?**

सतत ताप येणे, डोकेदुखी, थंडी वाजणे, स्नायुदुखी, उलटी आणि कावीळ सारखी लक्षणे या आजारात पाहायला मिळतात. तसेच रुग्णांना श्वास घेण्यास अडचणी येतात. मूत्रपिंड आणि यकृत निकामी होते. यावर योग्यवेळी उपचार मिळाल्यास त्या व्यक्तीचा मृत्यू होण्याचा धोका टाळता येतो.

**अशी घ्या काळजी**

१. पावसाळ्यात पाणी तुंबलेल्या ठिकाणाहून चालू नये. पाण्यात चालताना गुडघ्यापर्यंत गमबूट घालावेत. तसेच दूषित पाण्याच्या संपर्कात येऊ नका.

२. पायावर कोणतीही जखम असेल तर त्यावर वेळीच योग्य तो उपचार करावा. दूषित पाण्यामुळे जखम आणखी वाढून संसर्गजन्य आजार वाढू शकतात.

३. घाणीच्या पाण्यातून घरी आल्यानंतर अंघोळ करावी. तापासारखी लक्षणे दिसल्यावर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. कचरा वेळेत साफ करावा. घराजवळ पाणी साचणार किंवा तुंबणार नाही याची काळजी घ्यावी. पावसाळ्यात होणारे संसर्गजन्य आजार, ताप किंवा जखमांकडे दुर्लक्ष करू नका.

# कशेडी घाटात मृतदेह फेकणाऱ्या महिलेसह तिघांना अटक

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर पोलीसांनी ३० एप्रिल रोजी आढळलेल्या बेवारस अज्ञात व्यक्तीच्या प्रेताबाबत शोध घेताना एका महिलेसह तीन आरोपी गजाआड केल्याची माहिती सहायक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांनी दिली. यामुळे दोन आरोपींचा कर्नाटक सीमावर्ती भागात गेले दोन महिने चाललेला लपाछपीचा आणि पोलीसांना गुंगारा देण्याचा खेळ खल्लास झाल्याचे स्पष्ट झाले आहे.



पोलादपूर पोलीस ठाण्याच्याहद्दीत ३० एप्रिल रोजी जुन्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील दरीभागात एका अज्ञात इसमाचे साधारणत: तीन दिवस कुजलेले प्रेत कॉंक्रीटच्या संरक्षक भिंतीपलीकडे आढळून आले. या घटनेची खबर भोगावच्या पोलीस पाटील शुभांगी उतेकर यांनी ३० एप्रिल रोजी दिली उन्हात दोनतीन दिवस कुजल्याने परिसरात दूर्गंधी पसरली होती. या घटनेनंतर पोलादपूर पोलिसांनी तांत्रिक व मानवी गुप्त माहितीच्या आधारे मृतदेहाची ओळख पटवत तातडीने तपास करताना केवळ अक्षय जाधव या तरूणाला तपासाअंती ताब्यात घेतले. अक्षय जाधव याच्याकडून प्राप्त माहितीनुसार मयत व्यक्तीचे नांव सुनील दादा हसे,(वय-५४,रा.अंबड, ता-अकोले, जि.-अहिल्यानगर) असे होते.

यावेळी पुढील तपासामध्ये या खुनामध्ये मुख्य दोन आरोपींचा सहभाग उघडकीस आला. सुनील हसे हा वॉक्सवॅगन कार (क्रमांक एमएच१५ डीएस ८००५) ही भाडयाने देणे आणि स्वत: वाहन चालवून उपजिविका साधणे असा व्यवसाय करीत असे. त्याची वंदना दादासाहेब पुणेकर (वय ३६, रा.लेन, जयसिंगपूर, ता.कोल्हापूर) हिच्यासोबत गाडीने लिफ्ट देण्याच्या निमित्ताने ओळख झाली. वंदना पुणेकर हिला सुनील दादा हसे हा श्रीमंत आणि सधन वाटल्याने तिने त्याला जाळयात ओढले. मात्र, त्याच्याकडे फारसे आढळून न आल्याने तिने अक्षय जाधवसोबत त्याला संपविण्याचा घाट घातला. यामुळे तिने तिचा नवरा मोहन पांडुरंग सोनार,(वय-५४, रा-बोरसूत, ता-संगमेश्वर, जि-रत्नागिरी) याची मदत घेतली. मोहनच्या मदतीने वंदना पुणेकर हिने सुनील हसे याच्या गाडीमध्ये मागील सीटवर बसून त्याला दि.२७ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास गुंगीचे औषध पाजले आणि त्याला कराड चिपळूणमार्गे पोलादपूरच्या दिशेने आणताना गाडीतच ओढणीने मागील सीटवरून गळा आवळून ठार मारले आणि पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटातील जुन्या महामार्गालगत कॉंक्रीटच्या संरक्षक कठडयालगत दरीमध्ये टाकले. यानंतर हे दोघे आरोपी गेल्या दोन महिन्यांपासून फरार होते आणि आपली ओळख लपवत कर्नाटकमधील सीमाभागात लपून राहत होते.

# पैशाने भरलेली पर्स पोलीस ठाण्यात केली जमा; सार्थक खोजेचा सत्कार

**खालापूर : प्रतिनिधी**

सार्थक खोजे हा तरुण भानवज खोपोली कडे आपल्या घरी पायी चालत जात असताना पंत पाटणकर चौकात पैशाने भरलेली पर्स रस्त्यावर पडली असल्याचे लक्षात येताच ती पर्स सार्थकने उचलून घराकडे जाण्या ऐवजी खोपोली पोलिस स्टेशनला जाऊन जमा केली.

नवनियुक्त खोपोलीचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी सार्थक चा सत्कार करीत पाठीवर शाबासकीची थाप दिली व.पर्सची माहिती घेत मुळ मालकाला परत केली. पैशाने भरलेली पर्स इमानदारीत पोलीस स्टेशन जमा केली त्यावेळेस सार्थक खोजे याचा सत्कार पोलिस निरीक्षक सचिन हिरे यांनी सन्मान केला.



## आयुष्मान भारत कार्ड देण्यासाठी आरोग्य शिबिर

**चौक:** आयुष्यमान भारत कार्ड नागरीकांना देण्याकरीता व त्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी कॅम्प आयोजित केला होता, त्याच ठिकाणी आलेल्या लोकांसाठी आरोग्य शिबिर देखील घेतले होते.

आयुष्मान कार्ड काढण्यासाठी, या कार्ड ची माहिती व त्याचा फायदा याविषयी व आयुष्यमान भारत कार्ड उपलब्ध करुन देण्याकरीता, आयुष्यमान भारत कार्ड देण्याकरीता पुढील दोन महिने शिबीर सुरू ठेवण्यात येणार आहे

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे कि, मौजे - नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड येथील रेव्हेन्यु रेकॉर्ड मध्ये खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे मालक श्री. सखाराम हरी भोइर यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत**

| अनु क्र. | स.नं./हि.नं. | क्षेत्रफळ (हे-आर-प्र.) | आकार (रु.-पै.) |
|---|---|---|---|
| १. | ९३ / १ | ०-६०-४० + ०-०९-९० (पो.ख. | ११ - ४४ |
| | | ०-७०-३० एकुण | |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचे कोणत्याही प्रकारचे तारण, गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर कोणत्याही प्रकारचे इजमेन्ट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, भाडेकरू पणाचा हक्क, साठेकरार, कुळमुखत्यारपत्राने करार, मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तिंनी, इतर वारसांनी वा संबंधितानी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, आक्षेप, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती, आक्षेप, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १०/०७/२०२५
ठिकाण : पनवेल

**मार्फतः**
**ॲड. दीपा बिष्ट,**
द्वारा तिसरा मजला, सुनामा हाऊस, १४०, ऑगस्ट क्रांती मार्ग,
शालिमार हॉटेल समोर, केम्स कॉर्नर, मुंबई - ४०००२६.
ई-मेल: adv.deepabisht@gmail.com

# अंगणवाडी गुणवत्ता विकास प्रशिक्षण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभाग आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अंगणवाडी सेविकांसाठी दोन दिवसीय अंगणवाडी गुणवत्ता विकास प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गात अंगणवाडी सेविकांना ६ वर्षांपर्यंतच्या मुलांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी आवश्यक माहिती विविध प्रत्यक्षिकांच्या माध्यमातून देण्यात आली. हे प्रशिक्षण शिबीर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, महिला व बालविकास विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक यांच्या संकल्पनेतून घेण्यात आले.



८ व ९ जुलै रोजी अलिबाग तालुक्यात अंगणवाडी गुणवत्ता विकास प्रशिक्षण शिबीर पार पडले. प्रशिक्षणात ० ते ३ व ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलांच्या सर्वांगीण विकासावर तसेच समाज आणि मातांचा बालविकास प्रक्रियेत सहभाग वाढवून अंगणवाड्यांचे सक्षमीकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला. 'नवचेतना', 'आधारशीला' आणि माता गट बांधणी व सक्षमीकरण हे तीन प्रमुख घटक प्रशिक्षणाचे केंद्रबिंदू ठरले. या प्रशिक्षणात सर्व एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प मधील सर्व बिटच्या पर्यवेक्षिका तसेच सेविका याना प्रशिक्षण देणेत आले असून, त्यांच्यामार्फत उर्वरित सर्व अंगणवाडी सेविकाना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार अंगणवाडीतील बालकांचा पूर्व प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम करण्यावर भर देण्यात येणार आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी ८ जुलै रोजी प्रशिक्षण शिबिरास भेट देत अंगणवाडी सेविकांना मार्गदर्शन केले.

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन - ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई-मेल: coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाइट: kbmc.gov.in.

**जा.क्र. : कुबनप/भांडार विभाग/३२/२०२५-२६** **दिनांक :- ०९/०७/२०२५**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. ०४/२०२५-२०२६**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या अख्यारित्यीत असलेल्या एरंजाड शाळा क्र. १५, कुळगांव शाळा क्र. ०१, कुळगांव शाळा क्र. २ ऊर्दू, बेलवली शाळा क्र. १६ यामधील इयत्ता ०९ व १० वीमधील विद्यार्थ्यांना शर्ट, पॅट, टाय, टोपी, पट्टा, शुज, सॉक्स, आणि मुलींना सलवार, कुर्ता, दुपट्टा, शुज, सॉक्स इत्यादी साहित्य खरेदी करुन पुरविणेबाबत निविदाधारकाकडुन दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक मागविणेत येत आहे. निविदा संच विक्री व स्विकृती दिनांक १०/७/२०२५ पासुन सकाळी १०.३० पासुन ते दिनांक १६/७/२०२५ रोजीपर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत राहील. तसेच निविदा उघडणे (शक्य झाल्यास) दिनांक १७/७/२०२५ रोजी सायंकाळी १६.०० अथवा अन्य सोईच्या दिवशी.
तसेच याबाबत संपूर्ण माहिती https:/mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन प्राप्त करावयाचे असुन त्याच संकेत स्थळावर ई-निविदा फॉर्म फी, इसारा (बयाणा) रक्कम व ई-निविदा Online सादर करणे बंधनकारक आहे. प्राप्त निविदापैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा कारणाशिवाय सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगाव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव यांनी राखुन ठेवला आहे. निविदा नियम व अटी-शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगाव. यांनी राखुन ठेवला आहे.

निविदा पुर्व बैठक दि. १४/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. मुख्याधिकारी यांच्या दालनात होईल. बैठकीत गणवेषाचे व इतर साहित्याचे नमुने **(मुले :- गुलाबी रंगाचा हाफ शर्ट व फॉन रंगाची फुल पॅट, फॉन रंगाची टोपी (कॅप), फॉन रंगाचा पट्टा, फॉन रंगाची टॉय, कॅनवॉस बुट (शुज), सफेद कॉटन सॉक्स व मुली :- एस. कुमार / मोफतलाल कंपनीचे खाकी फेन्ट रंगाचा सलवार, गुलाबी रंगाचा कुर्ता, फॉन रंगाचा दुपट्टा, फॉन रंगाची टोपी (कॅप), फॉन गुलाबी रंगाचा पट्टा, कॅनवॉस बुट (शुज), सफेद कॉटन सॉक्स)** घेऊन उपस्थित राहावे. व सदर नमुने सादर केल्याबाबत मा. मुख्याधिकारी यांच्याकडुन प्रमाणित करुन घेण्यात यावे. व प्रमाणित केलेली प्रत निविदेच्या तांत्रिक बाबींचा लिफाफा क्रमांक एकमध्ये सादर बंधनकारक करणे राहील. प्रमाणित केल्याची प्रत सादर न केल्यास आपली निविदा विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद,**
**कुळगांव**

# इंदुमती शाह चॅरिटेबल ट्रस्टतर्फे शालेय विद्यार्थ्यांना टीशर्ट, वह्यावाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

श्रीमती इंदुमती वसंतलाल शाह चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई तर्फे विश्वस्त गणेश सावंत यांच्या माध्यमातून पिटसई येथील अशोक लोखंडे विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावी मधील सुमारे तीनशे शालेय विद्यार्थ्यांना टी शर्ट,टोपी,वह्या वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी सनदी लेखापाल केवल आनंद कोहलिया,गट विकास अधिकारी महादेव शिंदे,प्रमुख पाहुणे निलेश कदम,विश्वस्त गणेश सावंत,रसिका पवार,या शाळेचे अध्यक्ष खेळू वाजे, उपाध्यक्ष गोविंद ठाकर मुख्याध्यापक अरुण खुळपे,खजिनदार मनोहर गायकवाड,संचालक परशुराम गायकवाड,संचालक मारुती आडखळे,संचालक कृष्णकांत पवार आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

सदरील कार्यक्रम प्रसंगी लेखापाल केवल आनंद कोहलिया यांनी शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की,.आपल्याला काय व्हावे वाटते त्याप्रमाणे अभ्यासाची दिशा व कठोर मेहनत घेणे खूप आवश्यक आहे..परिश्रमाचे चीज होण्यासाठी आई वडील व गुरुजन वर्ग यांचे आशीर्वाद सुद्धा खूप आवश्यक असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.

यावेळी तीनशे विद्यार्थ्यांना टी शर्ट,प्रत्येक विद्यार्थ्यास सहा वह्या,पेन्सिल किट ,टोपी अशा असंख्य शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप मोठ्या प्रमाणात करण्यात आले.त्याच प्रमाणे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या बागेत वृक्षारोपण करण्यात आले.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-बोर्ले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १२३/२ | ०-३३-६०<br>पो. ख. ०-०३-००<br>एकूण ०-३६-६०<br>**पैकी ०-०३-००** | ०.३४ | **केवल पुडलिक पाटील**<br>**मनिषा गंगाराम पाटील**<br>**कल्याणी पुंडलिक पाटील**<br>**मथुरा पुंडलिक पाटील**<br>**माईबाई काशिनाथ मुंढे**<br>**शांताबाई विष्णू मुंढे**<br>**जनाबाई लक्ष्मण माळी**<br>**दिनेश अर्जुन पाटील**<br>**निधी नितिन गायकर**<br>**सुषमा अर्जुन पाटील** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०९/०७/२०२५**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१

रायगड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अलिबाग-रायगड. जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, दुसरा मजला, हिराकोट तलावाजवळ, अलिबाग, जिल्हा:- रायगड ४०२ २०१
कार्यालय फो.नं. ०२१४१/२२४२२५

सत्यमेव जयते

RAIGAD DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL FORUM, RAIGAD-ALIBAG. COLLECTOR OFFICE BUILDING, 2nd FLOOR, NEAR HIRACOTE TALAV, ALIBAG, DIST-RAIGAD 402201
Office Tel. No. 02141/224225

E-MAIL ID:- confo-rg-mh@nic.in
Website:- www.confonet.nic.in

जा.क्र.जिग्रातनिआ/राय/जाहिर नोटीस/२०२५/ 750
दिनांक:- ०१/०७/२०२५

**तक्रार क्रमांक २३१/२०२४**

Manisha Madhukar Tamboli
2. Shailesh K Chaurasiya
3. Seema Shailesh Chaurasiya — दरखास्तदार

विरुद्ध

Akala Group Builders And Developers
Through Partner,
Shri. Satyaprkash Sharmanand Maurya Having
Address At:- 302, B-wing. Palm Ruchi Apartment.
Takka, Panvel, Tal. Panvel, Dist. Raigad, Pin - 410206 — सामनेवाले

**जाहिर नोटीस**

वर नमूद तक्रारदार यांनी सामनेवाले यांच्या विरुद्ध ग्राहक संरक्षण कायदा २०१९ कलम ७१ अन्वये दरखास्त दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता स्विकारत नाहीत / पत्ता बदलला/ मिळून येत नाही. म्हणून या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की,

विरुद्ध पक्ष यांनी वर नमूद पत्यावर दि. **३०/०७/२०२५** रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर तर्फे प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्ष हे हजर न राहिलेस ग्राहक तक्रार आयोगाचा एकतर्फी आदेश पारित करणेत येऊन पुढील आदेश करण्यात येईल यांची दाखल घ्यावी. मे. अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबाग यांचे आदेशानुसार.

**ठिकाण:- अलिबाग-रायगड**
**दिनांक :- ०१/०७/२०२५**

**सही/-**
**प्र. प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,**
**अलिबाग-रायगड**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक २६/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | तळोजा फीडर सिमेंट कॉंक्रीट रस्त्यावर स्पीड ब्रेकरची व्यवस्था करणे व रस्त्यावरील खड्डे भरणे. | ₹ ७,०४,४५६.०० |
| २. | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी संकलन वाहिन्यांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ८८,३५,१५९.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १४/०७/२०२५ ते दिनांक २८/०७/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक १७/०७/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २१/०७/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E -TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000036940**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-2/ 2025-2026.**<br>RFx E-tender for Hiring of vehicle at 220kV Uran Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.08.2025 to 31.03.2025.<br>**Tender amount Rs. 3,87,637/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **09.07.2025, 18:00 Hrs. to 20.07.2025, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 20.07.2025 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **21.07.2025 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505
**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(A. P. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V.(O&M) DN. PANVEL**

# केशव हेडगेवार आणि संघ स्थापना

नागपुरात १ एप्रिल १८८९ रोजी केशव बळीराम हेडगेवार यांचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव रेवतीबाई होते. आई-वडील आणि भावंडांसोबत त्यांचे लहाणपण सुखात गेले. अचानक नागपुरात देवीच्या आजाराची साथ आली. आठ वर्षांच्या केशवला देवीच्या आजाराची लागण झाली. देवीच्या आजारातून ते बरे झाले, पण देवीचे डाग त्यांच्या चेहऱ्यावर राहिले. त्यानंतर केशववर यज्ञोपवित संस्कार करण्यात आले. केशव जन्मापासूनच देशभक्त होता. व्हिक्टोरिया सरकारच्या षष्ठ्यब्दिपूर्ती वेळी त्यांच्या शाळेत मिठाई वाटली होती. पण केशव म्हणाले की, 'महाराणी आपली कशी? हा आपल्या गुलामगिरीचा उत्सव आहे. तो आम्ही साजरा करणार नाही'. १९०२ साली नागपूरमधील प्लेगच्या महामारीमुळे त्यांच्या आई-वडिलांचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर गरिबीचे संकट आले, मात्र केशव यांनी शिक्षण सोडले नाही. १९०५ साली केशव यांनी स्वातंत्र्य संग्रामाचा मार्ग स्वीकारला. काही मित्रांना एकत्र आणून केशवने चर्चामंडळ स्थापन केले.

देशातल्या परिस्थितीवर भाषण आणि परिसंवादासारखे कार्यक्रम होऊ लागले. १९०८ साली विद्यालयातून केशव यांचे नाव काढून टाकण्यात आले, परंतु ते त्यामुळे थांबले नाहीत. समोर आली. त्यानंतर स्वयंसेवकांसाठी निश्चित वेषभूषा आवश्यक आहे. तेव्हा असे ठरले की, गुडघ्यापर्यंत खाकी पँट, खाकी शर्ट आणि काळी टोपी असा वेश संघाच्या सर्व स्वयंसेवकांनी स्वखर्चाने तयार करून घ्यावा. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे नाव सर्वांच्या मतांनुसार ठरले आणि सर्वांनी त्याचा स्वीकारही केला. त्यामुळेच संघाच्या व्यक्तींना स्वयंसेवक म्हणून पाचारण केले जाऊ लागले. १९२५ ते १९४० पर्यंत डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी संघाचे नेतृत्व केले. डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे केवळ भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे योद्धे नव्हते, तर हिंदू संघटनेचे प्रणेते होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) संस्थापक म्हणून त्यांची ओळख आजही राष्ट्रभक्ती, शिस्त आणि आत्मबलिदानाचे प्रतीक मानली जाते. २१ जून ही त्यांची पुण्यतिथी. १९०८ मध्ये इंग्रज निरीक्षकाच्या दौर्यात त्यांनी वंदे मातरमचा नारा दिला आणि त्याबद्दल त्यांना शिक्षा देत शाळेतून निलंबित करण्यात आले. लहान वयातच त्यांनी इंग्रजांच्या सत्तेला आव्हान दिले.

## डॉक्टरी शिक्षण, पण ध्येय वेगळे

कोलकात्यातून वैद्यकीय शिक्षण घेत असताना ते अनुशीलन समिती आणि 'युगांतर' सारख्या क्रांतिकारी गटांशी जोडले गेले. 'केशब चक्रवर्ती' या टोपणनावाने काकोरी कटात सहभागी



ते कलकत्त्याला गेले. तेथे डॉक्टरीची परीक्षा ते ६० टक्क्यांनी उत्तीर्ण झाले. नोकरीशिवाय राष्ट्रीय कामाला त्यांनी वाहून घेतले. आपले सारे जीवन त्यांनी राष्ट्राला समर्पित केले होते. अविवाहित राहून त्यांनी आपले आयुष्य राष्ट्राला अर्पण केले. अनेक वर्षे आंदोलन आणि तीव्र संघर्षानंतर त्यांच्या लक्षात आले की हिंदुंच्या दुर्दशेचे कारण स्वाभिमानाची कमतरता आणि संघटनेचा अभाव हेच आहे. ते म्हणाले की, 'हा देश म्हणजे काही धर्मशाळा तर नाही की कोणीही यावं आणि आपले अंथरूण पसरून आपलं राज्य स्थापन करावं. समाजतल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये राष्ट्रभक्तीची भावना निर्माण होणे, राष्ट्राच्या स्वरूपाचे ज्ञान निर्माण होणे, विराट संघशक्ती निर्माण होण्यासाठी महान संघशक्ती स्थापना करणे आवश्यक आहे. २७ सप्टेंबर १९२५ रोजी त्यांनी संघ स्थापनेची घोषणा केली. या संघाचे कार्य हे शारीरिक, सैनिक तसेच राष्ट्रीय शिक्षण स्वत: घेणे तसेच दुसऱ्यांनाही हे शिक्षण देणे, असे स्वरूप असेल. संघाला नाव देण्यासाठी डॉ. हेगडेवार यांनी १७ एप्रिल १९२७ रोजी स्वत:च्या घरी बैठक बोलावली होती. या बैठकीत तीन नावं झाले, मात्र नंतर त्यांना जाणवले की, भारतासारख्या देशात केवळ शस्त्रक्रांतीने स्वातंत्र्य शक्य नाही. हिंदू समाजाला संघटित करून राष्ट्रीय चेतना निर्माण करणे हीच स्वातंत्र्याची खरी वाट ठरू शकते. या विचाराने त्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली. संघाची स्थापना विजयादशमी, १९२५ म्हणजेच २७ सप्टेंबर १९२५ रोजी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर त्यांनी नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यांचा उद्देश होता, हिंदू समाजात एकता निर्माण करणे, आत्मविश्वास जागवणे आणि संस्कृतीची पुनर्स्थापना. शाखा पद्धतीद्वारे त्यांनी संघटन बांधले. प्रत्येक स्वयंसेवकाशी व्यक्तिगत संपर्क आणि संवाद ठेवून त्यांनी संघाचा भक्कम पाया रचला. आज रा. स्व. सं. हे जगातील सर्वात मोठे स्वयंसेवी संघटन मानले जाते.

## काँग्रेसशी मतभेद, पण राष्ट्रकार्य अविरत

१९२० मध्ये नागपूर काँग्रेस अधिवेशनात त्यांनी 'पूर्ण स्वराज्य'चा ठराव मांडला होता, जो तत्कालीन नेत्यांनी फेटाळला. (१९३० मध्ये गांधीजींच्या मीठाच्या सत्याग्रहात त्यांनी सहभाग घेतला आणि नऊ महिने तुरुंगवास भोगला, मात्र वैचारिक मतभेदामुळे त्यांनी शेवटी स्वतंत्र मार्ग निवडला. २१ जून १९४० रोजी नागपुरात त्यांचे निधन झाले. मृत्यूपूर्वी त्यांनी गुरुजी माधव सदाशिव गोळवलकरयांना उत्तराधिकारी म्हणून निवडले. आजही त्यांच्या विचारांची प्रेरणा लाखो स्वयंसेवकांच्या जीवनात झळकते. डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे एक द्रष्टे नेता, निर्भय देशभक्त आणि कुशल संघटक होते. त्यांच्यानंतर १९४० ते १९७३ पर्यंत गोळवलकर गुरूजी, त्यानंतर १९७३ ते १९९४ पर्यंत बाळासाहेब देवरस. १९९४ ते २००० पर्यंत रज्जू भैय्या, २००० ते २००९ पर्यंत सुदर्शन जी आणि २००९ ते २०२५ म्हणजे आजपर्यंत मोहन भागवत नेतृत्व करीत आहेत. आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. आज स्वयंसेवकांची संख्या अंदाजे १५ कोटी आहे. देश आणि विदेशात संघाच्या अंदाजे एक लाख शाखा भरतात.

देशभरात दरदिवशी ५७ हजार शाखा भरतात. याशिवाय अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, नेपाळ या देशांसह ४० हून अधिक देशांमध्ये हिंदू स्वयंसेवक संघ म्हणजे एच. एस. एस.च्या नावाने शाखा चालविल्या जातात. त्याशिवाय विद्याभारती, सेवाभारती, राष्ट्र सेविका समिती, भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यासारख्या रा.स्व.संघाच्या प्रमुख संस्था हजारो सेवा प्रकल्प चालवित आहेत. त्याशिवाय वनवासी कल्याण आश्रम, वनबंधू परिषद, संस्कार भारती, विज्ञान भारती, लघू उद्योग भारती, सेवा सहयोग, सेवा इंटरनॅशनल, आरोग्य भारती, दुर्गा वाहिनी, सामाजिक समरसता मंच, ऑर्गनायझर, पांच्यजन्य, श्रीराम जन्मभूमी मंदिर निर्माण न्यास, दीन दयाळ शोध संस्थान, भारतीय विचार साधना, संस्कृत भारती, हिंदू हेल्पलाईन, हिंदू मुन्नानी, अखिल भारतीय साहित्य परिषद, भारतीय किसान संघ, विवेकानंद केंद्र, तरुण भारत, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, हिंदुस्तान समाचार, विश्व संवाद केंद्र, जनकल्याण रक्तपेढी, इतिहास संकलन समिती, स्त्री शक्ती जागरण, एकल विद्यालय, धर्म जागरण, भारत भारती, सावरकर अध्यासन, शिवाजी अध्यासन, पतितपावन संघटना, यासारख्या अनेक संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वटवृक्षातून निर्माण झाल्या आहेत. यापुढेही हजारो वर्ष भारताची त्या सेवा करतील.

आपल्या शंभर वर्षांच्या कार्यकाळात रा. स्व. संघाने भारतीय समाजाच्या सर्व वर्गांपर्यंत पोहचून शिक्षण, सेवा, संस्कृती, राष्ट्रभावनेला मजबूत केले आहे आणि भविष्यातही करीत रहाणार आहेत. जय हिंद, वंदेमातरम.

**'परम् वैभवम् नेतुमेतत्व राष्ट्रम्'**

**(संकलन)**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्ष

# जागृती आणि संघर्ष

मुसलमानांचे लांगुलचालन करण्याच्या काँग्रेसी नीतीचे कटू परिणाम पाहून डॉक्टर हेडगेवारांच्या मनात एक नवे विचार चक्र सुरु झाले.

देश स्वतंत्र तर व्हायलाच पाहिजे. क्रांतिकारकांच्या सुसूत्रताहीन प्रयत्नाने स्वाधीनता प्राप्त होणार नाही हे त्यांच्या लक्षात आले आणि त्यांनी स्वतःला त्या कार्यापासून दूर केले. काँग्रेसने अवलंबलेल्या मार्गाने जनतेमध्ये स्वातंत्र्यासाठी जागृती होत होती. जागृती आवश्यक होती, पण त्यांच्या हेही ध्यानात आले की केवळ जागृती पुरेशी नाही. या जनजागृतीच्या आधारावर प्रत्यक्ष संघर्ष करणारे संघटन जोपर्यंत उभे राहत नाही तोपर्यंत स्वातंत्र्य संग्रामाला परिणामकारक स्वरूप प्राप्त होणार नाही. जागृत समाज सहानुभूती प्रकट करू शकेल, सहाय्य देखील करू शकेल पण सघर्षासाठी ठराविक लोकांनाच पुढे येऊन मोर्चा संभाळावा लागेल. सर्व जनता आघाडीवर वर जात नाही. स्वातंत्र्य संग्रामाच्या बाबतीतही असेच आहे. काही लोकच स्वातंत्र्यप्राप्तीच्या ध्येयाने एकत्रित येतील, ते अनुशासनबद्ध राहतील, त्याग व मृत्यूला घाबरणार नाहीत. अशा लोकांच्या सहय्यार्थ सहानुभूती पूर्ण समाज उभा राहील. अशी स्थिती निर्माण झाली तरच स्वातंत्र्याची लढाई यशस्वी होऊ शकेल.

समुद्रात हिमनग असतात. त्यांचा फक्त एक अष्टमांश भाग वर दिसतो. सात अष्टमांश भाग पाण्याच्या खाली असतो. पण ह्या हा एक अष्टमांश भागावर त्याहीपेक्षा मोठे जहाज जर आदळले तर जहाज फुटून जातं. या एक अष्टमांश भागात एवढी ताकद का असते? कारण वरती दिसणारा हा भाग पाण्याखालील सात अष्टमांश भागाशी जोडलेला असतो. काँग्रेसच्या प्रयत्नाने जनजागृती नक्कीच झाली, पण स्वातंत्र्यासाठी आघाडीवर गेलेल्या शूवीरांचे समाजाशी नातं राहिलं नाही. हे नातं निर्माण करण्यासाठी गांधीजींना वेळच मिळाला नाही. त्यामुळेच सन १९४२चे आंदोलन असफल झाले. नेताजी सुभाष चंद्र बोस यांची सेना सीमेवर पोचली तेव्हा संपूर्ण देश थंड पडलेला होता. देशव्यापी आंदोलनाचा तो काळ होता. परंतु आंदोलनामध्ये चैतन्य निर्माण करणारे नेते बंदीवासात होते आणि या बंदीवासातून कसे कधी मुक्त होणार याविषयी अस्पष्टता होती. डॉक्टर हेडगेवार यांच्या मनामध्ये कशा



प्रकारचे विचार चालले होते हे समजावं म्हणूनच त्यांच्या मृत्यूच्या पश्चात सन १९४२ च्या आंदोलनाचे उदाहरण दिले आहे.

डॉक्टर हेडगेवार यांच्या मनामध्ये आणखीन एक विचार घोळत होता. मूठभर इंग्रज या देशात आले, त्यांचा देश आपल्या देशापासून हजारो मैल दूर होता, ते सेना घेऊन आले नव्हते, केवळ व्यापार करायच्या तयारीने आले होते आणि त्यांनी हा देश जिंकला. केवढं मोठं आश्चर्य. त्यांना आपला देश कोणी जिंकून दिला? डॉक्टरजींच्या हे लक्षात आलं - आम्हीच आमचा देश त्यांना जिंकून दिला. आमचेच लोक त्यांच्या सैन्यात सैनिक म्हणून भरती झाले. आमचेच लोक अधिकारी आणि व्यवस्थापक झाले.

डॉक्टरजींच्या काळात जालियनवाला हत्याकांड झाले. जालियनवाला बागेत २००० लोकांवर इंग्रज अधिकाऱ्यांच्या आदेशानेच गोळ्या चालवल्या गेल्या व त्यांच्या हत्या केल्या गेल्या. जालियनवाला बाग हे पंजाबच्या अमृतसरमध्ये एक मोठे मैदान आहे. त्याच्या चारी बाजूला भिंती आहेत. केवळ एकच प्रवेशद्वार आणि तेदेखील खूप अरुंद. इंग्रज सरकारचा निषेध करण्यासाठी इथे एक मोठी सभा झाली होती. ही सभा उधळून लावण्याचा निश्चय इंग्रज सरकारने केला. सभा सुरू होऊन भाषण सुरू झालं त्यावेळेला इंग्रज अधिकाऱ्याने गोळ्या चालवण्याचा आदेश दिला. या गोळीबारात हजारो लोक मारले गेले. जे लोक हाता पायावर सरपटत निघून गेले ते वाचले.

त्यांच्यावर गोळ्या कोणी चालवल्या? आपल्याच लोकांनी. आदेश देणारा अधिकारी इंग्रज होता, पण बंदुका चालवणारे लोक आपलेच होते. मरणारे ही आपलेच आणि मारणारे ही आपलेच. अरबस्तानातून, इराकहून, अफगाणिस्तानातून जे विधर्म आक्रमणकारी आले त्यांचे सैनिक आणी सरदार कोण होते? आमचेच लोक होते. मोहम्मद गजनवी ला मार्ग दाखवणारे आपलेच लोक होते. मानसिंग अकबराचा सेनापती होता आणि मिर्झा राजा जयसिंग औरंगजेबाचा सेनापती होता. शिवाजी महाराजांचे वडील शहाजी आधी निजामशाच्या दरबारात आणि नंतर आदिलशहाच्या दरबारात उच्च श्रेणीचे सरदार होते. हे सर्व मोठी बहादूर लोकं होते पण असा व्यवहार या सगळ्यांचा का होता? समाजाचे नेतृत्व करणाऱ्या लोकांची जर ही स्थिती तर सामान्य लोकांची काय स्थिती असेल?

अशा प्रकारचे विचारचक्र पुष्कळ दिवस पर्यंत डॉक्टरांच्या मनात सुरू होते. हा विचार त्यांना अस्वस्थ करत होता आणि मग त्यांनी असं ठरवलं की समाज संघटित होणे आवश्यक आहे. ज्यांना या देशाविषयी प्रेम आणि आत्मीयता आहे अशाच लोकांना आधी संघटित करायला हवं. आम्ही कोण, आमचे मित्र कोण, आमचे शत्रू कोण याचे भान असणे आवश्यक आहे. आणि ही जागरूकता सतत असायला हवी. संघटन याचा अर्थ केवळ एकत्रीकरण नाही, केवळ गर्दी नाही, जत्रेमध्येदेखील लोक एकत्र होतात, बाजारातदेखील पुष्कळ लोक एकत्रित होतात, पण ते संघटन नसतं. संघटन म्हणजे एका विशिष्ट विचाराने आणि आचरणाने संस्कारित लोकांचे एकत्रिकरण. असे संस्कार कोण देऊ शकेल?

सामान्यपणे दोन ठिकाणी असे संस्कार स्वाभाविकपणे होतात. एक घर आणि दुसरे विद्यालय. घरामध्ये संस्कार होतात पण ते केवळ घरासाठी, घरापुरतेच. त्या संस्कारांना सामाजिक दिशा नव्हती, राष्ट्रीय दृष्टिकोन नव्हता. विद्यालयांमध्ये केवळ माहिती दिली जात होती, परीक्षा उत्तीर्ण होण्यापुरती. आजची स्थितीदेखील तशीच आहे. त्यामुळे डॉक्टरजिंना एक वेगळीच पद्धत अवलंबावी लागली. त्यांच्या या विचार मंथनातूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली आणि संघाची कार्यपद्धती देखील निश्चित झाली. हे कार्य करण्याचे निश्चित होताच त्यांनी अन्य सर्व सार्वजनिक कामांपासून स्वतःला बाजूला केलं. ते काँग्रेसमध्ये पदाधिकारी होते. ते जर तिथेच राहिले असते तर अधिक वरचं पद त्यांना मिळालं असतं. परंतु त्यांनी तो मोह सोडून दिला. सोबत कोणाला घ्यायचे? त्यांनी असं ठरवलं की ज्यांची पाटी कोरी आहे, अस्पर्शीत आहे त्यावर काही लिहिता येतं. आणि म्हणून त्यांनी दहा-बारा वर्षाची काही छोटी मुलं एकत्रित केली. त्यावेळेला डॉक्टरजींचे वय ३६ वर्षांचे होते. लोकांनी त्यांना वेड्यात काढलं. कारण त्यांनी नाव लौकिकाकडे पाठ फिरवली आणि लहान मुलांच्या सोबत खेळणे, त्यांच्या सोबत उठबस करणे, त्यांच्या सोबत चर्चा वार्तालाप करणे यामध्ये स्वतः ला सीमित करून घेतलं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अशा पद्धतीने सुरुवात झाली.

**(मा. गो. वैद्य यांच्या मूळ हिंदी लेखाचे भाषांतर)**

# सीकेटी महाविद्यालयामध्ये युवा महोत्सव एक दिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठच्या विद्यार्थी विकास विभाग आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५८व्या युवा महोत्सव २०२५-२६ करिताची एक दिवसीय रायगड जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन सोमवारी (दि.७) यशस्वीरीत्या आयोजित





करण्यात आले.

या कार्यशाळेसाठी रायगड उत्तरआणि रायगड दक्षिण या विभागातील एकूण ५५ महाविद्यालयाने सहभाग घेतला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आंतर-महाविद्यालय युवा महोत्सवाचे आयोजन मुंबई विद्यापीठातर्फे करण्यात आले. या स्पर्धेसाठी विविध विभागांमध्ये असलेल्या स्पर्धेच्या माहिती देण्यातआली सोबतच सदर स्पर्धेसाठी कशा पद्धतीने तयारी करण्यात यावी यासाठी ही कार्यशाळा दरवर्षी आयोजित करण्यात येते.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी मुंबई विद्यापीठचे सांस्कृतिक समन्वय निलेश सावे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितीलाभली. यासोबतच रायगड उत्तरजिल्हा समन्वयक डॉ. पराग कुरळकर, उत्तर रायगड जिल्हा सहसमन्वयक डॉ. दीपक गायकवाड, रायगड दक्षिण जिल्हा समन्वयक प्राध्यापक जयेश पाटील, रायगडदक्षिण जिल्हा सहसमन्वयक डॉ. बालाजी राजभोज यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेच्या विविध सत्रामध्ये मान्यवरांनी येऊन आपल्या कलेचे सादरीकरण केलं.यामध्ये सुप्रसिद्ध तबला व ढोलकी वादक विजय जाधव, नृत्यदिग्दर्शक अमोल बावकर, संगीतकार साहिल जोशी, अमेय आणि अनेक नामवंत कलाकारांनी सहभाग घेऊन महाविद्यालयांमधील शिक्षकांना व विद्यार्थी प्रतिनिधींना या स्पर्धेबद्दल माहिती दिली. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.आकाश पाटील वआभारप्रदर्शनसांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. गीतिका तन्वरयांनी केले.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी चांगु काना ठाकूर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. गीतिका तन्वर आणि सांस्कृतिक समन्वयक गणेश जगताप यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

# आज चिरनेर ते वहाळ पायी पालखी दिंडी

**उरण : वार्ताहर**

गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे याहि वर्षी ॐ साई सेवा मंडळ चिरनेर तर्फे श्री महागणपती मंदिर चिरनेर (उरण) ते श्री साई मंदिर वहाळ (पनवेल) दरम्यान श्री साईबाबाची पायी पालखी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री महागणपती मंदिर चिरनेर येथून वारकरी दिंडी पदयात्रा गुरुवारी (दि.१०) सकाळी ११ वा. श्रीची आरती करून साई मंदिर वहाळ येथे प्रस्थान होणार आहे. यंदाचे हे पदयात्रेचे १३ वे वर्ष आहे.

पदयात्रेसाठी गजानन फुंडेकर (कार्याध्यक्ष), अमित मुंबईकर (अध्यक्ष), नितीन नारंगीकर (उपाध्यक्ष), संतोष चिर्लेकर (सचिव), प्रसाद पाटील (खजिनदार), बबन ठाकूर (सल्लागार), गजानन म्हात्रे (सल्लागार), हरिश्चंद्र मोकल (सल्लागार), रमेश म्हात्रे (सल्लागार) यांच्यासह ॐ साई सेवा मंडळ चिरनेरचे सर्व पदाधिकारी सदस्य विशेष मेहनत घेत आहेत.

# धामोळे व बेलपाडा येथील शाळांना अतिरीक्त आयुक्त शेटे यांची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार महापालिका कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या ३१ शाळांच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. मंगळवारी (दि.८) अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी धामोळे व बेलपाडा येथील शाळांच्या दुरूस्तीच्या कामाची पहाणी करून कामाचा आढावा घेतला.



धामोळे येथील शाळेमध्ये १ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग भरले जात असून, मोडकळीस आलेल्या धामोळे येथील शाळेच्या दुरुस्तीचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. हे काम जवळपास पुर्ण झाले आहे. या ठिकाणी एक मजली शाळेची दुरूस्ती करण्यात आली असून यामध्ये फरशी बदलणे, फॉल्स सिलींग करणे, दरवाजे खिडक्यांची नव्याने बसविणे अशी विविध कामे करण्यात आली आहे. तसेच फॅन लाईट बसवून शाळेचे रंगकाम करण्यात आले आहे.

याचबरोबर बेलपाडा येथे १ली ते ४थी पर्यंतचे वर्ग भरले जात असून ही तळ मजल्यावरती ही शाळा भरली जात आहे. या ठिकाणी फरशी बदलणे, प्लास्टर करणे, फॉल्स सिलींग करणे, जाळी बसविण्याची कामे करण्यात आली आहेत. दरवाजे खिडक्या नव्याने बसविण्यात आल्या आहेत. याबरोबरच फॅन लाईट बसवून शाळेचे रंगकाम करण्यात आले आहे.

या वेळी सेवानिवृत्त अधिकारी विनायक जाने, कनिष्ठ अभियंता कोमल जाधव, स्नेहल लांब, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी उपस्थित होते.

# महाड रायगड मार्गाची दुर्दशा, खड्ड्यांचे जाळे

**महाड : प्रतिनिधी**

ऐतिहासिक किल्ले रायगडकडे जाणाऱ्या महाड रायगड मार्गाचा प्रवेशद्वार असलेल्या नातेखिंडीमध्ये खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. मात्र ठेकेदार आणि अधिकारी अपघात होण्याची वाट पाहतात का असा प्रश्न स्थानिक नागरिकांकडून विचारला जात आहे.

ऐतिहासिक रायगड किल्ल्याकडे जाणारा महाड रायगड मार्ग नातेखिंडपासून पुढे सिमेंट काँक्रिटीकरण झाला असला तरी या मार्गाचा प्रवेश मात्र अद्याप खड्ड्यांतूनच होत आहे. येथील डोंगर अद्याप फोडला न गेल्यामुळे रुंदीकरण



रखडलेले आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी जुना डांबरी रस्ता असल्याकारणाने या रस्त्याला गेल्या अनेक वर्षांपासून असलेले खड्डे तसेच कायम आहेत. सध्या हा महामार्ग बांधकाम विभागाकडे असून देखील याकडे दुर्लक्ष केले जात आहे. इथून प्रवास करणारे दुचाकी स्वार आणि लहान वाहनांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

किल्ले रायगड मार्गाचे रुंदीकरण काँक्रिटीकरणाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. अनेक ठिकाणी छोट्या मोठ्या पुलांची कामे बाकी आहेत. त्यातलाच एक भाग म्हणून या ठिकाणी असलेला डोंगर फोडून रुंदीकरण होणे अद्याप अपूर्ण आहे. यामुळे याठिकाणी खड्डेच खड्डे तयार झाले आहेत. या खड्ड्यातून मार्ग काढताना पर्यटक, स्थानिक नागरिक आणि दुचाकी वाहन चालकांना प्रचंड त्रास होत आहे. या बाबतीत यापूर्वी अनेक तक्रारी देखील झाल्या आहेत मात्र संबंधित ठेकेदाराची पाठ राखण करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून या खड्ड्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने अधिकारी अपघाताची वाट पाहतात का असा सवाल नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

नातेखिंड या ठिकाणी असलेल्या महामार्गाच्या उड्डाणपुलाखाली करण्यात आलेली कामे देखील अनियोजित असल्याने या ठिकाणी फेरीवाल्यांनी कब्जा केला आहे. त्याचप्रमाणे समोरच केलेल्या दुभाजकामुळे देखील अपघात होण्याची शक्यता आहे. या ठिकाणी असलेले अतिक्रमण काढून त्या ठिकाणी सौंदर्यकरण केले जावे अशा प्रकारची मागणी देखील सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे करण्यात आली होती.

# स्वयंसहाय्यता समूहांना ८८ लाखांचे कर्ज वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पंचायत समिती उमेद अभियान अंतर्गत बँक कर्ज धनादेश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ता. ५ जुलै रोजी उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष पंचायत समिती माणगाव मध्ये २६ महिला स्वयं सहायता समूहांना एकूण अठ्ठेयेंशी लाख रुपये एवढे बँक कर्ज वाटप करण्यात आले.

माणगाव तालुक्यातील स्वयंसहायता समूहाने आजपर्यंत केलेल्या नाविन्य पूर्ण उपक्रम यांचे मंत्री तटकरे यांनी कौतुक केले, उमेद अंतर्गत स्थापन केलेली सात्विक महिला शेतकरी



उत्पादक कंपनीच्या वतीने सदर कार्यक्रम मध्ये स्टॉल लावण्यात आला होता मंत्री महोदयांनी तेथेही भेट दिली. उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष पंचायत समिती माणगाव मध्ये १४८९ महिला स्वयं सहायता समूह, ८४ महिला ग्राम संघ, सात्विक शेतकरी उत्पादक कंपनी व चार प्रभाग संघ कार्यरत आहेत.

तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष पंचायत समिती माणगाव यांच्या नियंत्रण मध्ये हे सर्व सुरु आहेत. या महिलांना आर्थिक पाठबळ मिळावे साठी बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया, रा. जि. मध्यवर्ती सह बँक यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

# मुरूडमध्ये स्वच्छता मोहीम

## सफाई अपनाओ बिमारी भगाओ नगरपरिषदेचा नारा

**मुरुड : प्रतिनिधी**

शासनाच्या सुचनेनुसार मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक सचिन बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद कर्मचारी व सफाई कामगार व मराठी शाळेचे शिक्षक वर्ग यांनी श्री काळभैरव मंदीर एकदरा पुलाजवळ पासुन ते तवसाळकर समुद्रकिनारा जेट्टी पर्यंत स्वच्छता मोहीम राबवुन परिसर व समुद्रकिनारा स्वच्छ करण्यात आला.

यावेळी स्वच्छता मोहिमेत नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक सचिन बच्छाव , कर निरीक्षक अनिकेत जगदाळे, शहर अभियंता अनिकेत वाजे,रचना सहाय्यक अनिकेत भोसले, सिटी को-ऑर्डिनेटर सचिन



कोरके, कपिल वेहेले, प्रशांत दिवेकर, प्रकाश आरेकर,सतेज निमकर, शिक्षण मंडळाचे प्रशासकीय अधिकारी -दिपाली दिवेकर,शहर स्तरीय अभियंता जयकृष्ण भिसे,संजय बामगुडे, प्रज्वल गुरव, पल्लवी डोंगरीकर, अक्षता तुळसकर,स्वप्नजा विरुकुड, नम्रता करडे,सतिष जंजिरकर, प्रणाली करडे नगर परिषदेसोबतच सर्व कर्मचारी, अधिकारी, सफाई कामगार व स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक सचिन बच्छाव म्हणाले की स्वच्छता हीच खरी सेवा यांचा विचार सर्वांनी स्वीकारुन व्यक्तिगत व कार्यालयीन जीवनामध्ये स्वच्छता ही सेवा धर्म मानुन कार्य करावे. शहर स्वच्छ व सुंदर कसं राहील याकडे पाहिले पाहिजे. तरच पर्यटकांची संख्या वाढण्यास मदत होईल. सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियानांत ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे

# मोफत नेत्र शिबिरात ७२ रुग्णांची तपासणी ४१ रुग्णांवर शस्त्रक्रिया

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार दि. ९ जुलै रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ७२ रुग्णांची तपासणी करून ४१ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सदरचे शिबीर हे दर महिन्याच्या



एका बुधवारी होत असते.दक्षिण रायगडातील माणगाव,महाड,म्हसळा,श्रीवर्धन,तळा,पोलादपूर, रोहा आदी तालुक्यांतील जवळपास गेल्या वर्षभरापासून शिबिरात २८०३ हुन अधिक रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली.

# कृषी संशोधन केंद्रात कृषी सप्ताहाचे उत्साहात समापन

**कर्जत : प्रतिनिधी**

येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि राज्याच्या हरित क्रांतीचे प्रणेते कै.वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन तसेच दिनांक १ ते ७ जुलै दरम्यान आयोजित कृषी सप्ताहाचा समापन कार्यक्रमही उत्साहात पार पडला.

या वेळी वनस्पती रोग शास्त्रज्ञ डॉ. पुष्पा पाटील, कृषिविद्यावेत्ता डॉ. विजय सागवेकर,कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, कीटक शास्त्रज्ञ डॉ. वैशाली सावंत, कनिष्ठ भात पैदासकार डॉ. महेंद्र गवई, कनिष्ठ कृषिविद्यावेत्ता डॉ. नामदेव म्हसकर, कनिष्ठ संशोधन सहायक डॉ. राजेंद्र सावळे, कृषी पर्यवेक्षक महेश घारपुरे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी कै.वसंतरावजी नाईक यांच्या जीवनपटाचा नेटक्या शब्दात आढावा घेतला.त्यांच्यामुळेच अन्नधान्य, दुग्धोत्पादन, कृषि शिक्षण,सिंचन, वीज प्रकल्प, ग्रामविकास इ. क्षेत्रात राज्य अग्रेसर झाल्याचे सांगत ते आधुनिक महाराष्ट्राचे



महानायक होते, असे त्यांनी नमूद केले.

जयंती व कृषि सप्ताहाचे औचित्य साधून कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, भात पैदास विभाग, कृषिविद्या प्रक्षेत्र आणि एम.ए.ई. प्रक्षेत्रावर शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध वृक्षांचे सामूहिक वृक्षारोपण केले.डॉ वाघमोडे यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व विशद केले व प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्याचे संगोपन हिरीरीने करण्याची गरज प्रतिपादित केली.

# तांबडी येथील निर्भयाच्या न्यायासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा

## सक्षम सरकारी वकीलाबाबत लवकरच निर्णय -ना.अदिती तटकरे

**धाटाव : प्रतिनिधी**

तांबडी येथील निर्भयाच्या अत्याचार व हत्या प्रकरणातील आरोपींची सत्र न्यायालयाने निर्दोष सुटका केली. हा धक्कादायक निकाल सर्वच संवेदनशील समाजाच्या जिव्हारी लागला, ख्यातनाम वकील उज्ज्वल निकम यांनाही हा निकाल अनपेक्षीत असल्याचे सांगत मीमांसा केली. राज्याला हादरवून सोडलेल्या, फास्ट ट्रॅकवरील निकालाविरोधात मागील महिन्यात तालुक्यातील बहुजन समाजाने आक्रोश व्यक्त केला. आरोपींच्या सुटकेच्या निषेधार्थ हजारोंच्या मोर्चाने थेट



तहसिल कार्यालयावर धडक दिली. चौकशीसाठी एमआयटी स्थापन करा असा संताप व्यक्त झाला.

खासदार सुनिल तटकरे, मंत्री अदिती तटकरे यांनीही हा निकाल वेदनादायी असल्याची भावना व्यक्त केली. ना तटकरे यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेऊन उच्च न्यायालयात अधिक सक्षमतेने खटला चालविण्याची ग्वाही दिली. याच क्रमशः घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाजाचे अध्यक्ष आप्पा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली समाज बांधव व कुटुंबियांनी मंगळवारी खटल्याचे सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची मुंबईत भेट घेतली.

तांबडी येथील अल्पवयीन मुलीवर जुलै २०२०रोजी अत्याचार, त्यानंतर हत्या केल्याची खळबळजनक घटना घडली. त्याचे पडसाद सबंध राज्यात उमटले. हा खटला फास्ट ट्रॅकवर चालविण्याचा निर्णय घेत ॲड उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. पीडितेला न्याय मिळेल ही अपेक्षा सत्र न्यायालयाच्या आरोपी निर्दोष घटनेने फोल ठरली

अखेर हा खटला उच्च न्यायालयात दाखल करण्यात येणार असल्याची स्पष्ट ग्वाही ना अदिती तटकरे, खा सुनिल तटकरे यांनी दिली. मंगळवारी सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची समाजाचे अध्यक्ष आप्पा देशमुख व कुटुंबीयांनी मुंबईत भेट घेतली. यावेळी पत्रकार राजेंद्र जाधव, संदीप सावंत, प्रशांत देशमुख व नातेवाईक उपस्थित होते.

# शेतकरी व कामगार नेते प्रमोद मोरे यांचा शिवसेनेत प्रवेश



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक ,कामगार व शेतकरी चळवळीतील अग्रगण्य व लढाऊ नेतृत्व प्रमोद मोरे यांनी आपल्या असंख्य समर्थक कार्यकर्त्यांसह नुकतेच बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे) पक्षात जाहीर प्रवेश केला.

याचवेळी विधानसभा संघटक लहू शेठ पाटील व प्रमोद मोरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून संतोष शेठ कदम, भूषण शेलार बाबू शिंदे , धीरज शेलार या प्रमुख कार्यकर्त्यांनी देखील शिवसेनेत (शिंदे )जाहीर प्रवेश केला. प्रवेशकर्त्या कार्यकर्त्यांचे आमदार महेंद्र दळवी व पदाधिकाऱ्यांनी पक्षात स्वागत केले. शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या लढ्यातून निर्माण झालेले सुधागड शेतकरी समन्वय संघर्ष समितीचे अध्यक्ष व रिलायन्स भारतीय श्रमिक शक्ती संघ युनिटचे जनरल सेक्रेटरी म्हणून प्रमोद मोरे हे कार्यरत आहेत. त्यांचा जनसंपर्क दांडगा असून सर्व समाज घटकांच्या उत्कर्षासाठी काम करण्याची तडफ असल्याने त्यांच्या प्रवेशाने पक्ष संघटना वाढीसाठी निश्चित लाभ होईल असे आमदार दळवी म्हणाले. यावेळी जिल्हाप्रमुख राजाभाई केणी ,कामगार नेते दीपक भाई रानवडे, उपजिल्हाप्रमुख उद्धव कुथे , माजी सभापती दिलीप भोईर,अलिबाग तालुकाप्रमुख अनंत गोंधळी ,कामगार नेते अरुण कुथे, प्रकाश मोरेतालुकाप्रमुख तुषार मानकवले उपस्थित होते.


# खोपोली पोलीस ठाण्याच्या पोलिस निरीक्षकपदी सचिन हिरे

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड आर्थिक गुन्हे शाखा पोलिस निरिक्षक पदावर कार्यरत असणारे सचिन हिरे यांची खोपोली पोलीस ठाण्याच्या पोलिस निरीक्षकपदी मंगळवार दि.८ जुलै रोजी नियुक्ति झाली आहे.

पोलिस निरिक्षक सचिन हिरे यांचे मूळ गाव नाशिक परंतु लहाणपण,शिक्षण मुंबईत झाले असून पोलिस अधिकारी म्हणून नियुक्ति झाले मुंबई,नवी मुंबई,ठाणे येथे काम केले आहे.सध्या रायगड आर्थिक गुन्हे शाखा पोलिस निरिक्षक पदावर कार्यरत होते.सन २०२४ -२५ रायगड जिल्हा स्पोर्ट्स इंचार्ज म्हणून काम केले आहे.

सचिन हिरे यांनी शीतल राऊत यांच्या उपस्थितीत पदभार स्विकारल्यावर अपघातग्रस्त टिमचे गुरूनाथ साठेलकर यांची टिम तसेच खोपोली पोलिस ठाण्यातील सर्व विभागातील पोलिस कर्मचाऱ्यांनी राऊत यांनी निरोप दिला तर हिरे यांचे स्वागत केले आहे.



# समर्पण, सातत्य आणि संयम...

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रायगडच्या पवित्र भूमीत जन्मलेला, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निष्ठावान संघटक आणि विकासाची दृष्टी असलेला कोकणाचा सुपुत्र म्हणून खासदार सुनील तटकरे साहेबांची महाराष्ट्राला ओळख आहे. मात्र, माझा आणि तटकरे साहेबांचा ऋणानुबंध त्या पलिकडचा आहे. गेल्या तीन-साडेतीन दशकांचा आमचा स्नेह आहे, मैत्री आहे... माझ्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रत्येक चढ-उताराच्या क्षणीखंबीरपणे साथ देणाऱ्या या स्नेह्याच्या वाढदिवसा निमित्त त्यांचे मनः पूर्वक अभिष्टचिंतन करतो.



गेल्या साडे तीन दशकाच्या प्रवासात अनेक भूमिकेत मी आणि तटकरे साहेबांनी सोबत काम केले आहे. आता मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष तर ते पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करत आहेत. या सहप्रवासात त्यांच्या जीवनाचे अनेक पैलू मला जवळून अनुभवता आले आहेत. खंबीर सहकारी काय असतो... हे मी अनुभवत आहे. त्यांच्या जीवनाबद्दल नेमकेपणाने सांगायचे झाले तर त्यांनी कायमच स्वतः च्या राजकीय हितापेक्षा पक्षहिताला प्राधान्य दिले आहे.

सन २०१४ मध्ये पक्षाचा आदेश मान्य करत त्यांनी मंत्रीपदाची संधी नाकारून लोकसभेची निवडणूक लढवली. तेथे त्यांचा निसटता पराभव झाला, मात्र पराभवाने न खचता त्यांनी २०१९ साली पुन्हा जिद्दीने उभे राहत ३१ हजार ५०० मतांनी विजय मिळवला. ही केवळ निवडणूक नव्हती, तर संघर्षाच्या बळावर पुन्हा उभं राहण्याची प्रेरणादायी कहाणी होती. त्यानंतर म्हणजे वर्षभरापूर्वी २०२४ मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आणि महायुतीसाठी अतिशय प्रतिकूल आणि आव्हानात्मक राजकीय परिस्थिती होती. विरोधकांनी जाणीवपूर्वक अनेक प्रश्न, आव्हानं, संभ्रम निर्माण केले होते. यावर यशस्वीपणे मात करत सुनील तटकरे साहेबांनी दृढ नेतृत्व, संयमित विचार, आणि ठाम भूमिकेच्या जोरावर रायगड लोकसभेच्या जागेवर विजय मिळवला. त्यांच्या रुपाने पक्षाला लोकसभेची एकमेव जागा मिळवली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रदेशाध्यक्ष या नात्याने त्यांनी दिलेली लढत म्हणजे समर्पण, सातत्य आणि संयमाचं मूर्तीमंत उदाहरण आहे.

लोकसभेच्या निवडणुकीनंतर अवघ्या काही महिन्यात राज्याच्या विधानसभेची निवडणुक जाहीर झाली. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आणि महायुतीला मिळालेल्या मर्यादित यशाने खचून न जाता त्यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष या नात्याने आपली जबाबदारी चोखपणे निभावली. या प्रतिकूल परिस्थितीत पक्षाला उभारी देताना त्यांनी प्रदेशाध्यक्ष म्हणून दिलेली साथ मी कधीही विसरु शकत नाही. विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने आम्ही राज्यभर झंजावाती दौरे केले, योग्य जागांवर काटेकोर नियोजन केलं आणि पक्षासाठी मोठ्या प्रमाणावर यश मिळवलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विजयात तटकरे साहेबांची प्रामाणिक साथ, विश्वासार्ह सोबत, भक्कम पाठबळ अत्यंत उपयुक्त ठरलं. या विजयात त्यांच्या संघटन कौशल्याचा सुध्दा मोठा वाटा आहे.

गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ आम्ही एकत्र काम करतो आहोत. प्रत्येक टप्प्यावर त्यांनी मला संपूर्ण साथ दिली आहे. खंबीरपणे सोबत केली आहे. त्यांच्यातली माणसं जोडण्याची ताकद, संवादातील सहजता, आणि निर्णयातील स्पष्टताया गुणांमुळे ते विश्वासार्ह सहकारी तर बनतात परंतु उत्तम संघटक सुध्दा ठरतात. राजकीय क्षेत्रात इतक्या उंचीवर पोहोचून सुध्दा सुनील तटकरे हे साहित्य, कला, क्रीडा, शिक्षण, सहकार, उद्योग या प्रत्येक क्षेत्रात सक्रिय आहेत. या प्रत्येक क्षेत्रात त्यांचा लिलया वावर आहे. कोकणात प्रत्येक सांस्कृतिक-सामाजिक कार्यक्रमात तटकरे साहेबांचा सहभाग हमखास असतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक प्रकारची आपुलकी आहे... त्यामुळे ते प्रत्येकालाच आपलेसे वाटतात.

कोकण रेल्वेप्रमाणेच आता मुंबई-गोवा महामार्ग हा कोकणच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. या महामार्गाच्या कामाचा पाठपुरावा तटकरे साहेब अत्यंत तडफेने करतात. विकासकामांचा पाठपुरावा करण्याची त्यांची पध्दत तर राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकासाठी अनुकरणीय आहे. ते केवळ प्रश्न मांडत नाहीत, तर तो सोडवण्यासाठी ते समोरच्याला पर्याय उपलब्ध करुन देतात. त्यामुळे विकासकामांच्या निमित्तानं त्यांच्याशी संबंध येणारा प्रत्येक जण त्यांच्याशी कायमचा जोडला जातो. तटकरे साहेबांची अनोखी नेतृत्वशैली आहे. पद, प्रतिष्ठा, किंवा अधिकार यांचा त्यांना कधीही गर्व नाही. त्यामुळे ते प्रत्येकाशी एका अपुलकीच्या धाग्याने कायमचे बांधले जातात. कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची त्यांची शैली आहे. त्यामुळे सामान्य जनता आणि पक्षातील कार्यकर्त्यांच्या काळजाशी जोडलेला हा नेता आहे.

त्यांचे वक्तृत्व प्रभावी, संयमी आणि अभ्यासपूर्ण आहे. विधिमंडळातून सुरु झालेली त्यांची कारकीर्द संसदेच्या सभागृहात आज आपले वेगळेपण टिकवून आहे. सभागृहातील त्यांची भाषणे, विकासकामांचा पाठपुरावा करण्याचे कसब हे राजकीय क्षेत्रात नव्याने काम करणाऱ्या प्रत्येकासाठी अनुकरणीय आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून पक्षाची भूमिका प्रत्येक मंचावर ते अत्यंत नेटाने, नेमकेपणाने आणि संयमाने मांडत असतात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विस्तार करण्यासाठी, पक्षाची ताकद वाढविण्यासाठी त्यांच्या सारख्या सच्च्या सहकाऱ्याची भक्कम साथ, खंबीर सोबत मला आहे, हे माझे भाग्य आहे.

खासदार सुनील तटकरे साहेबांचा वाढदिवस म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी, कोकणच्या विकासासाठी समर्पण, सातत्य आणि संयमाने काम करणाऱ्या नेत्याचा वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे मनःपूर्वक अभिष्टचिंतन करतो. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो, अशी प्रार्थना करतो.

**-अजित पवार,**
**उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य. राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.**

# लॉर्ड्‌सवर बुमराह-सिराजचे असणार इंग्लंडला आव्हान

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिसरा सामना १० जुलैपासून खेळवला जाणार आहे. या महत्त्वपूर्ण सामन्यात भारतीय संघाचे वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांच्या कामगिरीवर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

टीम इंडियाने एजबॅस्टन कसोटी जिंकून ‘तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी’ मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. यामुळे उर्वरित तीन सामन्यासाठी रोमांच निर्माण झाला आहे. आता मालिकेतील तिसरा सामना ऐतिहासिक लॉर्ड्‌स क्रिकेट मैदानावर खेळला जाणार आहे, जिथे मागील दौऱ्यात भारतीय संघाने इंग्लंडवर संस्मरणीय विजय मिळवला होता. दरम्यान, लॉर्ड्‌स कसोटीत जसप्रीत बुमराहचे टीम इंडियामध्ये पुनरागमन निश्चित मानले जात आहे. त्यामुळे लॉर्ड्‌सच्या खेळपट्टीवर बुमराह आणि सिराज या दोघांचा सामना करणे इंग्लंडच्या फलंदाजांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे.

बुमराह आणि सिराज या दोघांनाही आजवर लॉर्ड्‌सच्या मैदानावर प्रत्येकी एक कसोटी सामना खेळण्याची संधी मिळाली आहे. बुमराहने येथे खेळलेल्या एका सामन्यातील दोन डावांमध्ये गोलंदाजी करताना ३७.३३च्या सरासरीने एकूण तीन बळी मिळवले आहेत. दुसरीकडे सिराजची आकडेवारी अधिक प्रभावी दिसते. सिराजने दोन डावांमध्ये गोलंदाजी करताना केवळ १५.७५ च्या उत्कृष्ट सरासरीने आठ बळी घेतले आहेत. त्याची या मैदानावरची सर्वोत्तम कामगिरी ३२ धावांत चार बळी अशी आहे.

सध्या सुरू असलेल्या मालिकेतील पहिल्या सामन्यात सिराजला गोलंदाजीत विशेष यश मिळाले नव्हते, मात्र एजबॅस्टन कसोटीत त्याने आपल्या लय साधली आणि शानदार पुनरागमन करून एकूण सात फलंदाजांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

### आकाश दीपवरही नजरा

बुमराह आणि सिराज यांच्याव्यतिरिक्त लॉर्ड्‌स कसोटीमध्ये तिसरा वेगवान गोलंदाज म्हणून आकाश दीपचे संघातील स्थान निश्चित मानले जात आहे. एजबॅस्टन कसोटीत आकाश दीपची कामगिरी अत्यंत प्रभावी ठरली होती, ज्यात त्याने एकूण १० बळी मिळवण्याची किमया साधली होती. त्यामुळे लॉर्ड्‌सवर त्याची गोलंदाजी कशी होते याकडेही सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. बुमराह आणि मोहम्मद सिराज यांच्या कामगिरीवर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.



## आजपासून कसोटी मालिकेतील तिसरा सामना

## रायगडच्या दिनेश पवार यांना आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जपान हिमजी येथे सुरू असलेल्या एशियन आफ्रिकन पॅसिफिक पॉवरलिफ्टिंग आणि बेंचप्रेस चॅम्पियनशिप स्पर्धेत मास्टर्स बेंचप्रेस क्लासिक स्पर्धेमध्ये चाळीस वर्षावरील स्पर्धेत ७४ किलो वजनी गटात रायगडचे खेळाडू दिनेश गीता हरिचंद्र पवार यांनी सुवर्णपदक प्राप्त केले आहे. त्यांनी एकूण १४२.५ वजन घेतले. यापूर्वी सुद्धा बेंचप्रेस या प्रकारात २०२३(हाँगकाँग)२०२४(साऊथ आफ्रिका) या ठिकाणी झालेल्या स्पर्धेत त्यांनी आंतरराष्ट्रीय पदके पटकावले आहे. आपल्या यशाचे श्रेय आई गीता हरिचंद्र पवार आणि पत्नी रेशमा दिनेश पवार यांच्या प्रोत्साहनाला दिले आहे. दिनेश पवार हे स्पार्टन जिम खालापूर आणि जीत फिटनेस (घोडवली) खालापूर येथे सराव करत असतात.

दिनेश पवार यांचे यशाबाबत महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जनरल सेक्रेटरी संजय प्रतापराव सरदेसाई यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसेच पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन, रायगड अध्यक्ष गिरीश शरद वेदक, कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल, सहसचिव सचिन विठ्ठल भालेराव, सदस्य संदीप कृष्णा पाटकर, सुभाष टेंबे, मानस कुंटे, खजिनदार राहुल विजय गजरमल आणि ज्येष्ठ सदस्य माधव गोविंद पंडित,आणि सेक्रेटरी अरुण पाटकर यांनी सुद्धा खास पत्रकाद्वारे अभिनंदन व्यक्त केले आहे. सलग तीन आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सुवर्णपदक प्राप्त करून मास्टर खेळाडू दिनेश पवार यांनी एक विक्रम केला आहे.


















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com